भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# खाण व खनिज (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७

(सन १९५७ चा अधिनियम क्रमांक ६७)

[दिनांक २१ ऑगस्ट १९९३ रोजी यथाविद्यमान]

# The Mines and Minerals ( Regulation and Development ) Act, 1957

**(Act No. 67 of 1957)**

[ As in force on the 21st August 1993 ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९४
[ किंमत : रु. ४.७० पैसे ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २१ ऑगस्ट १९९३ रोजी यथाविद्यमान असलेला माईन्स अँड मिनरल्स (रेग्युलेशन) अँड डेव्हलपमेंट अॅक्ट, १९५७ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ५, अंक ३ दिनांक २५ ऑगस्ट १९९४ यात पृष्ठ ७० ते ९२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २५ ऑगस्ट १९९४.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Mines and Minerals (Regulation and Development) Act, 1957 as on the 21st August 1993 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary Part XII, section 1, No. 3, Vol. 5, dated 25th August, 1994 on pages 70 to 92.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 25th August, 1994.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the
Government of India.

# खाण व खनिज (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७

कलमांचा क्रम

कलमे


प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. संघराज्याचे नियंत्रण समयोजित असल्याबाबत घोषणा.

३. व्याख्या.

४. पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे ही लायसन किंवा पट्टा याखाली चालवणे.

४क. पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा यांची समाप्ती.

५. पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे देण्यावर निबंध.

६. ज्या कमाल क्षेत्रासाठी पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देता येईल ते कमाल क्षेत्र.

७. ज्या कालावधीसाठी पूर्वेक्षण लायसने देता येतील किंवा त्यांचे नूतनीकरण करता येईल ते कालावधी.

८. ज्या कालावधीसाठी खाणकाम पट्टे देता येतील किंवा त्यांचे नूतनीकरण करता येईल ते कालावधी.

९. खाणकाम पट्ट्यांच्या बाबतीत स्वामित्वधन.

९क. पट्टेदाराने ठोकबंद भाडे देणे.

ज्या जमिनीतील खनिजे शासनाकडे निहित असतील त्या जमिनीच्या संबंधात लायसन किंवा खाणकाम पट्टा मिळवण्याची कार्यपद्धती

१०. पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे यांच्यासाठी अर्ज.

११. विवक्षित व्यक्तींचा अग्रहक्क.

१२. पूर्वेक्षण लायसने व खाणकाम पट्टे यांच्या नोंदवह्या.

पूर्वेक्षण लायसने व खाणकाम पट्टे देण्याचे विनियमन करण्यासाठी नियम

१३. खनिजांच्या बाबतीत नियम करण्याची केंद्र सरकारची शक्ती.

१३क. भारताच्या क्षेत्रीय जलधीच्या किंवा सागरमग्न खंडभूमीच्या संबंधात पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे देण्यासाठी नियम करण्याची केंद्र सरकारची शक्ती.

१४. (कलमे ५ ते १३) किरकोळ खनिजांना लागू नसणे.

१५. किरकोळ खनिजांच्या बाबतीत नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

१६. दिनांक २५ ऑक्टोबर १९४९ पूर्वी दिलेल्या खाणकाम पट्ट्यात फेरबदल करण्याची शक्ती.

विवक्षित प्रकरणात पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे हाती घेण्याची केंद्र सरकारची विशेष शक्ती

१७. विवक्षित जमिनींमध्ये पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे हाती घेण्याची केंद्र सरकारची विशेष शक्ती.

१७क. संधारणाच्या प्रयोजनार्थ क्षेत्राचे आरक्षण करणे.

१८. खनिज विकास.

१८क. भारतीय भूशास्त्रीय सर्वेक्षण संस्था, इत्यादींना अन्वेषण करण्यासाठी प्राधिकृत करण्याची शक्ती.

कलमे

संकीर्ण

१९. अधिनियमांचे उल्लंघन करून दिलेली पूर्वेक्षण लायसने व खाणकाम पट्टे शून्य असणे.

२०. अधिनियम व नियम हे पूर्वेक्षण लायसनांच्या व खाणकाम पट्टयांच्या सर्व नूतनीकरणास लागू होणे.

२१. शिक्षा.

२२. अपराधांची दखल घेणे.

२३. कंपन्यांनी केलेले अपराध.

२३ क. अपराध आपसात मिटवणे.

२४. प्रवेश करण्याची व तपासणी करण्याची शक्ती.

२४-अ. पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकामपट्टाधारकाचे अधिकार व दायित्वे.

२५. विवक्षित रकमा जमीन-महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येतील.

२६. शक्तीचे प्रत्यायोजन.

२७. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

२८. नियम आणि अधिसूचना संसदेपुढे मांडणे आणि विवक्षित नियम संसदेने मान्य करणे.

२९. विद्यमान नियम चालू राहणे.

३०. केंद्र शासनाची पुनरीक्षण करण्याची शक्ती.

३०-क. दिनांक २५ ऑक्टोबर १९४९ पूर्वी दिलेल्या दगडी कोळशाच्या खाणकामपट्टयासंबंधीचे विशेष उपबंध.

३१. विशेष प्रकरणांमध्ये नियम शिथील करणे.

३२. निरसित.

३३. विवक्षित कृत्ये विधिग्राह्य करणे व निस्तारण.

अनुसूची १ ते ३

# खाण व खनिज (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७

(सन १९५७ चा अधिनियम क्रमांक ६७)[1]

[दिनांक २१ ऑगस्ट १९९३ रोजी यथाविद्यमान]

[२८ डिसेंबर १९५७]

**संघराज्याच्या नियंत्रणाखाली खाणीचे विनियमन करण्याचा व खनिजांचा विकास करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या आठव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास "खाण व खनिज (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७" असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा[2] दिनांकास तो अमलात येईल.

२. याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, संघराज्याने यात यापुढे उपबंधित केलेल्या मर्यादेपर्यंत खाणींचे विनियमन व खनिजांचा विकास करण्याचे काम आपल्या नियंत्रणाखाली घेणे हे लोकहिताच्या दृष्टीने समयोचित आहे. संघराज्याचे नियंत्रण समयोचित असल्याबद्दल घोषणा.

३. संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, या अधिनियमात— व्याख्या.

(क) "खनिजे" या शब्दात खनिज तेले खेरीजकरून सर्व खनिजांचा समावेश होतो;

(ख) "खनिज तेले" या शब्दप्रयोगात नैसर्गिक वायू व पेट्रोलियम यांचा समावेश होतो;

(ग) "खाणकाम पट्टा" या शब्दप्रयोगाचा अर्थ, खाणकामे हाती घेण्याच्या प्रयोजनासाठी दिलेला पट्टा असा होतो ; आणि त्यात अशा प्रयोजनासाठी दिलेल्या पोटपट्ट्याचा समावेश होतो ;

(घ) "खाणकामे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, कोणतेही खनिज काढण्याच्या प्रयोजनासाठी हाती घेतलेली कोणतीही कामे असा होतो ;

(ङ) "किरकोळ खनिजे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, बांधकामासाठी लागणारे दगड, बारीक खडी, साधी माती, विहित प्रयोजनांसाठी वापरावयाच्या वाळूखेरीज इतर साधी वाळू आणि केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे किरकोळ खनिज म्हणून घोषित करील असे कोणतेही अन्य खनिज, असा होतो ;

(च) "विहित केलेले" म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले होय ;

(छ) "पूर्वेक्षण लायसन" या शब्दप्रयोगाचा अर्थ, पूर्वेक्षणाची कामे हाती घेण्याच्या प्रयोजनासाठी दिलेले लायसन असा होतो ;

(ज) "पूर्वेक्षणाची कामे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, खनिजांच्या साठ्याचे समन्वेषण करणे, त्यांचे स्थान निश्चित करणे, किंवा त्यांची परीक्षा करणे या प्रयोजनासाठी हाती घेतलेली कोणतीही कामे असा होतो ; आणि

१९५२ चा ३५. (झ) "खाण" आणि "मालक" या शब्दप्रयोगांना "खाण अधिनियम, १९५२" यात त्यांना नेमून दिलेले अर्थ असतील.

---

१. हा अधिनियम १९६२ चा विनियम १२, कलम ३ व अनुसूची याअन्वये गोवा, दमण व दीव यावर ; १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची एक या अन्वये दादरा व नगर हवेली यावर ; आणि १९६३ चा विनियम ७, कलम ३ व अनुसूची एक या अन्वये पाँडिचेरीवर विस्तारित करण्यात आला आहे.

२. दिनांक १ जून १९५८, अधिसूचना क्रमांक जी.एस.आर. ४३२, दिनांक २९ मे १९५८ व भारताचे राजपत्र, १९५८, असाधारण, भाग दोन, अनुभाग ३ (एक) (इंग्रजी), पृष्ठ २२५ पहावे.

## पूर्वेक्षणाची कामे व खाणकामे हाती घेण्यावर सर्वसाधारण निर्बंध

**पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे ही लायसन किंवा पट्टा याखाली चालविणे.**

४. (१) या अधिनियमान्वये आणि त्याखाली केलेल्या नियमान्वये दिलेले पूर्वेक्षण लायसन किंवा प्रकरणपरत्वे खाणकाम पट्टा असल्यावाचून आणि त्याच्या अटी व शर्ती यांचे पालन केल्यावाचून कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही क्षेत्रात कोणतीही पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे हाती घेता येणार नाहीत :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभीपूर्वी दिलेले जे पूर्वेक्षण लायसन किंवा जो खाणकाम पट्टा अशा प्रारंभाच्या वेळी अमलात असेल, त्याच्या अटी व शर्ती यानुसार कोणत्याही क्षेत्रात हाती घेतलेल्या कोणत्याही पूर्वेक्षणाच्या कामास किंवा खाणकामास या पोटकलमातील कोणत्याही उपबंधामुळे बाधा येणार नाही.

[1][परंतु, आणखी असे की, या कलमातील कोणतीही गोष्ट भारताचे भूशास्त्रीय सर्वेक्षण, भारतीय खाण मंडळ केंद्र सरकारच्या अणुशक्ती विभागाचा अणु-खनिज विभाग कोणत्याही राज्य शासनाची कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी भूशास्त्र व खनिकर्म संचालनालये व खनिज समन्वेषण महामंडळ मर्यादित, कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ६१७ मधील अर्थान्तर्गत कोणतीही शासकीय कंपनी यांनी हाती घेतलेल्या कोणत्याही पूर्वेक्षणाच्या कामाला लागू होणार नाही.]

(२) या अधिनियमाच्या उपबंधाचे आणि त्याखाली केलेल्या नियमांचे पालन केल्याखेरीज अन्यथा कोणतेही पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देता येणार नाही.

[2][(३) कोणत्याही राज्य शासनास, केंद्र सरकारशी अगोदर विचारविनिमय करून व कलम १८ अन्वये केलेल्या नियमानुसार ज्या क्षेत्रासाठी पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा पूर्वीच दिलेला नाही. अशा त्या राज्यातील कोणत्याही क्षेत्रात पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही खनिजांच्या बाबतीत पूर्वेक्षणाचे काम किंवा खाणकाम हाती घेता येईल.]

**पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा यांची समाप्ति.**

४ क. [3][(१) राज्य शासनाशी विचारविनिमय केल्यानंतर केंद्र सरकारचे जर असे मत झाले असेल की, खाणींचे विनियमन व खनिजांचा विकास, नैसर्गिक पर्यावरणाचे जतन, पूरनियंत्रण, प्रदूषणास प्रतिबंध या गोष्टी करण्याच्या दृष्टीने किंवा सार्वजनिक आरोग्यास किंवा दळणवळणास धोका पोहचू नये म्हणून किंवा, इमारती, स्मारके किंवा अन्य बांधकामे यांच्या सुरक्षिततेची खातरजमा करण्यासाठी किंवा खनिज संपत्तीचे संधारण करण्यासाठी किंवा खाणीत सुरक्षितता दाखवण्यासाठी किंवा केंद्र सरकारला योग्य वाटतील अशा अन्य प्रयोजनांसाठी, एखादी पूर्वेक्षण लायसनाची किंवा खाणकाम पट्ट्याची मुदतपूर्व व्याप्ती करणे समयोजित आहे, तर केंद्र सरकार, कोणत्याही क्षेत्रातील किंवा त्याच्या भागातील किरकोळ खनिज खेरीजकरून अन्य कोणत्याही खनिजाच्या बाबतीत पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्ट्याची मुदतपूर्व समाप्ती करण्यासंबंधी राज्य शासनास विनंती करू शकेल, आणि अशी विनंती करण्यात आल्यावर, राज्य शासन, असे क्षेत्र किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाबत दिलेल्या अशा पूर्वेक्षण लायसनाची किंवा खाणकाम पट्ट्याची मुदतपूर्व समाप्ती करण्याविषयी आदेश देईल.

(२) केंद्र सरकारशी विचारविनिमय केल्यानंतर राज्य शासनाचे जर असे मत झाले असेल की, खाणींचे विनियमन व खनिजांचा विकास, नैसर्गिक पर्यावरणाचे जतन, पूर नियंत्रण, प्रदूषणास प्रतिबंध या गोष्टी करण्यासाठी किंवा सार्वजनिक आरोग्यास किंवा दळणवळणास धोका पोहचू नये म्हणून किंवा, इमारती, स्मारके किंवा अन्य बांधकामे यांच्या सुरक्षिततेची खातरजमा करण्यासाठी किंवा राज्य शासनाला योग्य वाटतील अशा अन्य प्रयोजनांसाठी, कोणत्याही किरकोळ खनिजाबाबत देण्यात आलेल्या पूर्वेक्षण लायसनाची किंवा खाणकाम पट्ट्याची मुदतपूर्व समाप्ती करणे समयोजित आहे. तर, राज्य शासन, जे क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग या अशा पूर्वेक्षण लायसनखाली किंवा खाणकाम पट्ट्याखाली येतो त्या क्षेत्राच्या वा भागाच्या संबंधातील पूर्वेक्षण लायसनाची किंवा खाणकाम पट्ट्याची आदेशाद्वारे मुदतपूर्व समाप्ती करेल :

परंतु, पोटकलम (१) अन्वये किंवा प्रकरणपरत्वे, पोटकलम (२) अन्वये, पूर्वेक्षण लायसनाची किंवा खाणकाम पट्ट्याची मुदतपूर्व समाप्ती केल्यानंतर, राज्य शासन, त्यास योग्य वाटेल अशा, शासनाच्या मालकीच्या असलेल्या किंवा शासनाकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या कंपनीला किंवा महामंडळाला पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा मंजूर करू शकेल.

(३) लायसनधारकास किंवा पट्टाधारकास त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, कोणतेही पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा याची मुदतपूर्व समाप्ती करण्याचा आदेश देण्यात येणार नाही.

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम २(क) अन्वये समाविष्ट करण्यात आहे (१ डिसेंबर १९८६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमच्या कलम २ (ख) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये मूळ पोटकलमाऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर १९८६ रोजी व तेव्हापासून).

(४) जर खाणकाम पट्टाधारकाने, खाणकाम पट्टयाच्या अमलबजावणीच्या दिनांकानंतर एका वर्षाच्या कालावधीत खाणकाम केले नाही किंवा खाणकामास प्रारंभ करून ते मधेच एका वर्षाकरिता थांबविलेले असेल तर, पट्टयाच्या अमलबजावणीच्या, किंवा प्रकरणपरत्वे खाणकाम थांबविण्यात आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर खाणकाम पट्टा व्यपगत होईल:

परंतु, अशा पट्टाधारकाने, या पोटकलमान्वये पट्टयाची मुदत संपण्यापूर्वी अर्ज केल्यास आणि पट्टाधारकास खाणकाम करणे किंवा खाणकाम चालू ठेवणे हे त्याच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणांमुळे शक्य होणार नाही, याबाबत राज्य शासनाची खात्री पटल्यास, राज्य शासन, असा पट्टा व्यपगत होणार नाही अशा आशयाचा आदेश विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने देईल:

परंतु आणखी असे की, भाडेपट्टा व्यपगत झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत पट्टाधारकाने अर्ज केल्यास आणि अशा पट्टाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या कारणांमुळे अशा खाणकामास प्रारंभ करता आला नाही किंवा कामात खंड पडला याबाबत राज्य शासनाची खात्री पटल्यास, राज्य शासन, भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी दिनांकापासून परंतु, पट्टा व्यपगत होण्याच्या दिनांकापूर्वी नाही अशा, त्यास योग्य वाटेल त्या दिनांकापासून पट्टा पुन्हा चालू करून देईल:

तसेच, पट्टयाच्या संपूर्ण कालावधीत, दुसऱ्या परंतुकान्वये दोनपेक्षा अधिक वेळा पट्टा पुन्हा चालू करता येणार नाही.

५. [1][ (१) राज्य शासन कोणत्याही व्यक्तीला, जर—

सर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे देण्यावर निर्बंध.

(क) ती भारताची नागरिक नसेल; आणि

(ख) विहित करण्यात येतील त्या शर्ती पूर्ण करीत नसेल तर पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देणार नाही :

परंतु, पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही खनिजाच्या बाबत, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेखेरीज कोणतेही पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देण्यात येणार नाही.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखादी व्यक्ती,

(क) कंपनी अधिनियम, १९५६ यात व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक कंपनी असल्यास, त्या कंपनीचे बहुसंख्य संचालक हे जर भारताचे नागरिक असतील आणि त्या कंपनीचे कमीतकमी ६० टक्के भाग भांडवल, उक्त अधिनियमात व्याख्या केलेल्या कंपन्यांनी किंवा भारताचे नागरिक असलेल्या व्यक्तींनी धारण केलेले असेल तरच;

(ख) उक्त अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे खाजगी कंपनी असल्यास, त्या कंपनीचे सर्व सदस्य भारताचे नागरिक असतील तरच;

(ग) उक्त अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे एखादी भागीदारी संस्थाचे किंवा अन्य व्यक्तीसंघ असल्यास, त्या भागीदारी संस्थेचे सर्व सदस्य किंवा त्या व्यक्तीसंघाचे सर्व सदस्य भारताचे नागरिक असतील तरच; आणि

(घ) एखादी व्यक्ती असल्यास, जर ती भारताची नागरिक असेल ; तरच भारतीय नागरिक असल्याचे मानण्यात येईल.

(२) पुढील गोष्टींची खात्री पटल्याशिवाय राज्य शासनाकडून कोणत्याही खाणकाम पट्टयास परवानगी दिली जाणार नाही :—

(क) ज्या क्षेत्रासाठी खाणकाम पट्टा मिळण्याकरिता अर्ज करण्यात आला आहे, त्या क्षेत्राचे पूर्वीच पूर्वेक्षण केलेले आहे आणि त्यात खनिजसंपत्ती आहे असे सिद्ध झालेले आहे :

परंतु, या खंडातील कोणतीही गोष्ट शासनाच्या विभागाने किंवा अभिकरणाने ज्या क्षेत्रात अगोदरच पूर्वेक्षण केलेले आहे आणि त्या क्षेत्रात खनिजांचा अंतर्भाव असल्याचे सिद्ध झाले आहे अशा क्षेत्राला लागू होणार नाही.

(ख) संबंधित क्षेत्रातील खनिजांच्या विकासाकरिता केंद्र सरकारने यथोचित रीत्या मान्यता दिलेली खनिज योजना आहे. ]

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम ४ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले (१ डिसेंबर १९८६ रोजी व तेव्हापासून).

ज्या कमाल क्षेत्रासाठी पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देता येईल ते कमाल क्षेत्र.

६. [1][(१) कोणत्याही खनिजाच्या किंवा विहित गटातील सहयुक्त खनिजांच्या बाबतीत, कोणत्याही [2]* * * * व्यक्तीस,—

(क) ज्या अन्वये एकूण पंचवीस चौरस किलोमीटरपेक्षा अधिक क्षेत्र व्यापले जाईल असे एक किंवा अशी अनेक पूर्वेक्षण लायसने संपादित करता येणार नाहीत ; किंवा

(ख) ज्या अन्वये एकूण दहा चौरस किलोमीटरपेक्षा अधिक क्षेत्र व्यापले जाईल असे एक किंवा अनेक खाणकाम पट्टे संपादित करता येणार नाहीत :

परंतु, कोणत्याही खनिजाचा विकास करण्याच्या दृष्टीने, उपरोक्तप्रमाणे होणाऱ्या एकूण क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्र व्यापले जाईल इतक्या क्षेत्रासाठी एक किंवा अनेक पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे संपादित करण्यासाठी एखाद्या व्यक्तीस परवानगी देणे आवश्यक आहे असे केंद्र सरकारचे मत झाले असेल तर, केंद्र सरकार, कारणे लेखी नमूद करून, अशा कोणत्याही व्यक्तीस, असे एक किंवा अशी अनेक पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे संपादित करण्यास परवानगी देऊ शकेल ;

(ग) एकसंध किंवा सलग नसलेल्या एखाद्या क्षेत्राच्या बाबतीत कोणताही खाणकाम पट्टा किंवा पूर्वेक्षण लायसन मिळवता येणार नाही :

परंतु, कोणत्याही खनिजाचा विकास करण्याच्या दृष्टीने एकसंध किंवा सलग नसेल अशा एखाद्या क्षेत्राच्या संबंधात पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा मिळवण्याची एखाद्या व्यक्तीस परवानगी देणे आवश्यक आहे असे केंद्र सरकारचे मत झाले असेल तर, केंद्र सरकार, कारणे लेखी नमूद करून कोणत्याही व्यक्तीस एकसंध किंवा सलग नसेल अशा कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा मिळवण्यास परवानगी देऊ शकेल.]

(२) एखाद्या व्यक्तीने स्वतःसाठी म्हणून योजलेले एखादे पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा दुसऱ्या व्यक्तीमार्फत किंवा तिच्या नावाने संपादित केला तर, त्या व्यक्तीने असे पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा स्वतः संपादित केला आहे असे या कलमाच्या प्रयोजनार्थ मानण्यात येईल.

[3][(३) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले एकूण क्षेत्र निर्धारित करताना, एखाद्या व्यक्तीने एखाद्या सहकारी संस्थेचा, कंपनीचा किंवा अन्य निगमचा किंवा एखाद्या अविभक्त हिंदु कुटुंबाचा सदस्य म्हणून किंवा एखाद्या पेढीचा भागीदार म्हणून, पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा या अन्वये धारण केलेले क्षेत्र पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रातून वजा करण्यात येईल ; म्हणजे, अशा व्यक्तीने असा सदस्य किंवा असा भागीदार म्हणून अगर व्यक्तिशः पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा या अन्वये धारण केलेल्या एकूण क्षेत्राची एकंदर बेरीज कोणत्याही बाबतीत पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या एकूण क्षेत्रापेक्षा अधिक होता कामा नये.] १९७२

ज्या कालावधीसाठी पूर्वेक्षण लायसने देता येतील किंवा त्याचे नूतनीकरण करता येईल ते कालावधी.

७. (१) ज्या कालावधीसाठी पूर्वेक्षण लायसन देता येईल तो कालावधी,—

(क) अभ्रकाच्या बाबतीत, एका वर्षापेक्षा अधिक ; आणि

(ख) अन्य कोणत्याही खनिजांच्या बाबतीत, दोन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही. १९७२

[4][(२) जर, लायसन धारकास पूर्वेक्षणाची कामे पूर्ण करण्यास अधिक अवधी लागणार आहे अशी राज्य शासनाची खात्री झाली, तर राज्य शासन, एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही इतक्या कालावधी-करिता पूर्वेक्षण लायसनाचे नूतनीकरण करील :

परंतु, अशा पूर्वेक्षण लायसनाचे, राज्य शासनाची अशी खात्री पटण्याच्या शर्तीस अधीन राहून, एक वर्षाहून अधिक असणार नाही इतक्या कालावधीकरिता आणखी नूतनीकरण करता येईल :

परंतु, आणखी असे की, केंद्र सरकारची पूर्व मान्यता घेतल्याखेरीज, अनुसूची एक मध्ये समाविष्ट असलेल्या एखाद्या खनिजाबाबत देण्यात आलेल्या कोणत्याही पूर्वेक्षण लायसनाचे नूतनीकरण करण्यात येणार नाही.]

---

१. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ३ द्वारे मूळ पोटकलम (१) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

२. १९८६ चा अधिनियम ३७, कलम ५ अन्वये "कोणत्याही एका राज्यात" हा मजकूर वगळण्यात आला.

३. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ३ द्वारे मूळ पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

४. १९८६ चा अधिनियम ३७, कलम ६ द्वारे मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल केले.

८. [1][(१) ज्या कालावधीसाठी खाणकाम पट्टा देता येईल तो कालावधी २० वर्षांपेक्षा अधिक असणार नाही. ज्या कालावधीसाठी खाणकाम पट्टे देता येतील किंवा त्यांचे नूतनीकरण करता येईल ते कालावधी.

(२) खाणकाम पट्टयाचे दोनदा नूतनीकरण करता येईल व प्रत्येक वेळी त्याचा कालावधी दहा वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

परंतु, पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या खनिजाच्या बाबतीत दिलेल्या खाणकाम पट्टयाचे केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेशिवाय नूतनीकरण करता येणार नाही.]

परंतु, पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या खनिजाच्या बाबतीत दिलेल्या खाणकाम पट्टयाचे केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेशिवाय, नूतनीकरण करता येणार नाही.

(३) पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी खनिजांचा विकास करण्याच्या दृष्टीने एखाद्या खाणकाम पट्टयाचे आणखी कालावधीसाठी किंवा कालावधींसाठी नूतनीकरण करण्यास प्राधिकार देणे आवश्यक आहे असे केंद्र सरकारचे मत झाले असेल तर केंद्र सरकार, कारणे लेखी नमूद करून आणखी कालावधीसाठी किंवा कालावधींसाठी खाणकाम पट्टयाचे नूतनीकरण प्राधिकृत करू शकेल. मात्र असा प्रत्येक कालावधी हा खाणकाम पट्टा मूलत: ज्या कालावधीसाठी दिला होता त्यापेक्षा अधिक असणार नाही.

९. (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेला खाणकाम पट्टा धारण करणारी व्यक्ती, अशा खाणकाम पट्टयाच्या संलेखामध्ये किंवा अशा प्रारंभाच्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी अशा प्रारंभानंतर [2][तिने अथवा तिचा एजंट, व्यवस्थापक, कर्मचारी, कंत्राटदार किंवा पोटपट्टेदार याने पट्टयाच्या क्षेत्रातून नेलेल्या किंवा वापरलेल्या कोणत्याही खनिजाच्या बाबतीत] दुसऱ्या अनुसूचीमध्ये त्या खनिजासंबंधी त्या त्या वेळी जो दर विनिर्दिष्ट केला असेल त्या दराने स्वामित्वधन देईल. खाणकाम पट्टयाच्या बाबतीत स्वामित्वधन.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी किंवा त्यानंतर देण्यात आलेल्या खाणकाम पट्टा धारण करणारी व्यक्ती [2][तिने अथवा तिचा एजंट, व्यवस्थापक, कर्मचारी, कंत्राटदार किंवा पोटपट्टेदार याने पट्टयाच्या क्षेत्रातून नेलेल्या किंवा वापरलेल्या कोणत्याही खनिजाच्या बाबतीत,] दुसऱ्या अनुसूचीमध्ये त्या खनिजासंबंधी त्या त्या वेळी जो दर विनिर्दिष्ट केला असेल त्या दराने स्वामित्वधन देईल.

१९७२ चा ५६. [3][(२क) "खाण व खनिज (विनियमन व विकास) विशोधन अधिनियम, १९७२" याच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर देण्यात आलेला खाणकाम पट्टा धारण करणारी व्यक्ती, कोळशाच्या खाणीत कामावर लावलेल्या कामगाराने वापरलेल्या कोणत्याही कोळशाच्या बाबतीत स्वामित्वधन देण्यास पात्र असणार नाही, मात्र अशा कामगाराने केलेला कोळशाचा वापर दरमहा एक-तृतीयांश टनापेक्षा अधिक असता कामा नये.]

(३) कोणत्याही खनिजाच्या बाबतीत ज्या दराने स्वामित्वधन प्रदेय असेल तो दर वाढविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी केंद्र सरकारास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे दुसरी अनुसूची अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकास व तेव्हापासून विशोधित करता येईल :

[4][परंतु, केंद्र सरकारास कोणत्याही खनिजाच्या बाबतीत [5][तीन वर्षांच्या] कोणत्याही कालावधीमध्ये एकापेक्षा अधिक वेळा स्वामित्वधनाचा दर वाढवता येणार नाही.]

१९७२ चा ५६. [6][९क. (१) "खाण व खनिज (विनियमन व विकास) विशोधन अधिनियम, १९७२" याच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर देण्यात आलेला खाणकाम पट्टा धारण करणारी व्यक्ती, पट्टयाच्या संलेखात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी पट्टयाच्या संलेखात अंतर्भूत केलेल्या सर्व क्षेत्रांसाठी, तिसऱ्या अनुसूचीमध्ये त्या त्या वेळी जो दर विनिर्दिष्ट करण्यात आला असेल त्या दराने राज्य शासनाकडे दर वर्षी ठोकबंद भाडे देईल : पट्टेदाराने ठोकबंद भाडे देणे.

परंतु, जेव्हा असा खाणकाम पट्टा धारण करणारी व्यक्ती तिच्या अथवा एजंट, व्यवस्थापक, कर्मचारी, कंत्राटदार किंवा पोटपट्टेदार याने पट्टयाच्या क्षेत्रातून नेलेल्या किंवा वापरलेल्या कोणत्याही खनिजाबद्दल कलम ९ अन्वये स्वामित्वधन देण्यास पात्र होईल तेव्हा ती व्यक्ती त्या क्षेत्राच्या बाबतीत स्वामित्वधन किंवा ठोकबंद भाडे यांपैकी जे अधिक असेल ते देण्यास पात्र होईल.

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम ७ द्वारे, मूळ पोटकलमांऐवजी दाखल केले.
२. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ४ द्वारे, "तिने पट्टयाच्या क्षेत्रातून नेलेल्या कोणत्याही खनिजाच्या बाबतीत" या मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.
३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे पोटकलम (२क) दाखल करण्यात आले.
४. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ४ द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल केले.
५. १९८६ चा अधिनियम ३७, कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.
६. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ५ द्वारे हे कलम समाविष्ट केले.

(२) खाणकाम पट्ट्यात समाविष्ट असणाऱ्या कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत ज्या दराने ठोकबंद भाडे प्रदेय असेल तो दर वाढविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी केंद्र सरकारास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तिसरी अनुसूची विशोधित करता येईल आणि अशी वाढ किंवा घट अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकापासून परिणामक होईल :

मात्र, केंद्र सरकारास [1][तीन वर्षांच्या कोणत्याही कालावधीमध्ये अशा कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत एकापेक्षा अधिक वेळा ठोकबंद भाड्याचा दर वाढवता येणार नाही.]

**ज्या जमिनीतील खनिजे शासनाकडे निहित असतील त्या जमिनीच्या संबंधात पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा मिळवण्याची कार्यपद्धती.**

पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे यांच्यासाठी अर्ज.

१०. (१) ज्या जमिनीतील खनिजे शासनाकडे निहित असतील अशा कोणत्याही जमिनीच्या संबंधात पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा मिळवण्यासाठी करावयाचा अर्ज हा, विहित नमुन्यात संबंधित राज्य शासनाकडे सादर केला पाहिजे व त्यासोबत विहित फी भरली पाहिजे.

(२) पोटकलम (१) अन्वये अर्ज आल्यावर, तो अर्ज मिळाल्याबद्दल विहित कालावधीच्या आत आणि विहित नमुन्यात अर्जदारास पोच देण्यात आली पाहिजे.

(३) या कलमान्वये अर्ज मिळाल्यावर, राज्य शासन, या अधिनियमाचे उपबंध आणि त्या अन्वये केलेले नियम लक्षात घेऊन, असे लायसन किंवा असा पट्टा देऊ शकेल अथवा असे लायसन किंवा असा पट्टा देण्यास नकार देऊ शकेल.

विवक्षित व्यक्तींचा अग्रहक्क.

११. (१) कोणत्याही जमिनीच्या संबंधात पूर्वेक्षण लायसन देण्यात आले असेल तेव्हा, लायसनधारकास त्या जमिनीच्या संबंधात खाणकाम पट्टा मिळण्याचा अन्य कोणत्याही व्यक्तीपेक्षा अग्रहक्क असेल:

[2][परंतु, लायसन धारकाने,

(क) त्या जमिनीत खनिज संपत्ती आहे हे सिद्ध करण्यासाठी अशा जमिनीवर खाणकाम हाती घेतले आहे ;

(ख) पूर्वेक्षण लायसनाच्या अटी व शर्तींचा कोणत्याही प्रकारे भंग केलेला नाही, आणि

(ग) खाणकाम पट्टा दिला जाण्यास ती व्यक्ती अन्यथा योग्य आहे, अशी राज्य शासनाची खात्री पटली पाहिजे.]

(२) एकाच जमिनीच्या संबंधात पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा मिळण्यासाठी जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्तींनी अर्ज केला असेल तेव्हा, पोटकलम (१) च्या उपबंधाच्या अधीनतेने, ज्या अर्जदाराचा अर्ज आधी मिळाला असेल त्या अर्जदारास, ज्या अर्जदाराचा अर्ज उशिरा मिळाला असेल त्या अर्जदारापेक्षा लायसन किंवा प्रकरणपरत्वे, पट्टा मिळण्याचा अग्रहक्क असेल :

परंतु, असे कोणतेही अर्ज एकाच दिवशी मिळाले असतील तेव्हा, पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी विचारात घेतल्यानंतर, राज्य शासनास जो अर्जदार योग्य वाटेल त्या अर्जदारास राज्य शासन पूर्वेक्षण लायसन किंवा, प्रकरणपरत्वे, खाणकाम भाडेपट्टा देऊ शकेल.

(३) पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) अर्जदारास पूर्वेक्षणाच्या कामासंबंधी किंवा, प्रकरणपरत्वे, खाणकामासंबंधी असलेले कोणतेही विशेष ज्ञान किंवा त्या बाबतीतील अनुभव;

(ख) अर्जदाराची वित्तीय साधने;

(ग) अर्जदाराने कामावर लावलेल्या किंवा लावावयाच्या तंत्रकुशल कर्मचारीवर्गाचे स्वरूप आणि त्याची गुणवत्ता ;

(घ) विहित करण्यात येतील अशा अन्य बाबी.

(४) पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु पोटकलम (१) च्या उपबंधाच्या अधीनतेने, राज्य शासन, कोणत्याही विशेष कारणास्तव व ती नमूद करून आणि केंद्र सरकारची पूर्वमान्यता घेऊन, ज्या अर्जदाराचा अर्ज आधी मिळाला असेल त्याच्या ऐवजी ज्या अर्जदाराचा अर्ज उशिरा मिळाला त्या अर्जदाराला प्राधान्य देऊन त्यास पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देऊ शकेल.

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

२. वरील अधिनियमाचा ३७, कलम १० अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

१२. (१) राज्य शासन, विहित नमुन्यात पुढील नोंदवह्या ठेवण्याची व्यवस्था करील :— पूर्वेक्षण लायसने व खाणकाम पट्टे यांच्या नोंदवह्या.

(क) पूर्वेक्षण लायसनांसाठी केलेल्या अर्जांची नोंदवही;

(ख) पूर्वेक्षण लायसनधारकांची नोंदवही;

(ग) खाणकाम पट्ट्यांसाठी केलेल्या अर्जांची नोंदवही आणि

(घ) खाणकाम पट्ट्यांच्या धारकांची नोंदवही;

आणि अशा प्रत्येक नोंदवहीत, विहित करण्यात येईल अशा तपशिलाची नोंद करण्यात येईल.

(२) राज्य शासन निश्चित करील अशी फी भरल्यावर कोणत्याही व्यक्तीला, अशी प्रत्येक नोंदवही पाहण्यासाठी खुली असेल.

पूर्वेक्षण लायसने व खाणकाम पट्टे देण्याचे विनियमन करण्यासाठी नियम

१३. (१) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, खनिजांच्या बाबतीत पूर्वेक्षण लायसने व खाणकाम पट्टे देण्याचे विनियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित प्रयोजनांसाठी नियम करू शकेल. खनिजांच्या बाबतीत नियम करण्याची केंद्र सरकारी शक्ती.

(२) विशेषतः, आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील :—

(क) ज्या, जमिनीतील खनिजे शासनाकडे निहित असतील त्या जमिनीच्या संबंधात, पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे मिळविण्यासाठी ज्या व्यक्तीस आणि ज्या रीतीने अर्ज करता येईल ती व्यक्ती व ती रीत आणि त्यासाठी द्यावयाची फी;

(ख) ज्या मुदतीच्या आत आणि ज्या नमुन्यात अशा कोणत्याही अर्जाची पोच पाठवण्यात येईल ती मुदत व तो नमुना;

(ग) एकाच जमिनीच्या बाबतीत एकाच दिवशी अर्ज मिळाले असतील तेव्हा, ज्या बाबी विचारात घेण्यात येतील त्या बाबी;

(घ) [1]* * * * * *

(ङ) ज्या जमिनीतील खनिजे शासनाकडे निहित आहेत अशा जमिनीच्या संबंधात जे प्राधिकरण पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे देऊ शकेल ते प्राधिकरण,

(च) ज्या जमिनीतील खनिजे शासनाव्यतिरिक्त अन्य व्यक्तीकडे निहित असतील अशा कोणत्याही जमिनीच्या संबंधात, पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा मिळवण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि ज्या अटींवर व ज्या शर्तींवर असे लायसन किंवा असा पट्टा देता येईल किंवा त्याचे नूतनीकरण करता येईल त्या अटी व शर्ती;

(छ) ज्या अटींवर व ज्या शर्तीवर अन्य कोणतेही पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देता येईल किंवा त्यांचे नूतनीकरण करता येईल त्या अटी व त्या शर्ती.

(ज) खाणकामाच्या संबंधातील बाबींचे संशोधन किंवा प्रशिक्षण हाती घेण्याच्या प्रयोजनासाठी शासनाने प्रतिनियुक्त केलेल्या व्यक्तींना खाणकाम पट्ट्यांच्या धारकांनी उपलब्ध करून द्यावयाच्या सोयी;

[2][(झ) पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकामपट्टा याकरिता फी, भूपृष्ठ भाडे, सुरक्षा ठेवी, द्रव्य दंड, अन्य फी किंवा आकार ठरवणे व ते वसूल करणे आणि ज्या कालावधीत व ज्या रीतीने ठोकबंद भाडे किंवा स्वामित्वधन ज्या रीतीने व ज्या कालावधीत देय होतील, ती रीत व तो कालावधी ठरवणे; ]

(ञ) ज्या प्रकरणांत कोणत्याही पूर्वेक्षणाच्या कामामुळे किंवा खाणकामामुळे स्वस्थ व्यक्तींच्या हितसंबंधाला बाध येत असेल अशा प्रकरणांत, ज्या रीतीने (भरपाई देऊन किंवा अन्यथा) अशा व्यक्तींच्या अधिकारांचे संरक्षण करता येईल ती रीत;

(ट) कलम ६ च्या प्रयोजनासाठी सहयुक्त खनिजांचे गट बनवणे;

(ठ) ज्या रीतीने आणि ज्या शर्तीवर पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा हस्तांतरित करता येईल ती रीत व त्या शर्ती;

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम ११ (एक) द्वारे खंड (घ) वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ (दोन) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(ड) एखाद्या खाणकाम पट्ट्यांच्या अंतर्गत असलेल्या कोणत्याही जमिनीवर खाणकामाच्या प्रयोजनांसाठी रस्ते, वीज पारेषण मार्ग, ट्राममार्ग, रेल्वे, हवाई रज्जुमार्ग (रोपवे), नळमार्ग यांचे बांधकाम करणे, त्यांची देखभाल करणे व त्यांचा वापर करणे आणि पाण्यासाठी मार्ग तयार करणे;

(ढ) या अधिनियमान्वये ठेवावयाच्या नोंदवह्यांचा नमुना;

(ण) [1]* * * * *

(त) पूर्वेक्षण लायसनधारकांनी किंवा खाणमालकांनी सादर करावयाचे अहवाल व विवरण-पत्रे आणि ज्या प्राधिकरणाकडे असे अहवाल व विवरणपत्रे सादर करण्यात येतील ते प्राधिकरण;

(थ) या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये प्रदान केलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करून, राज्य शासनाने किंवा अन्य प्राधिकरणाने दिलेल्या कोणत्याही आदेशानुसार पुनरीक्षणासाठी ज्या कालावधीच्या आत अर्ज करता येतील [2][त्यासाठी जेवढी फी देय असेल आणि अशा अर्जासोबत जे दस्तऐवज सादर करावे लागतील आणि ज्या रीतीने असे अर्ज निकालात काढण्यात येतील ते ;] आणि ;

[3][(थथ) पूर्वेक्षण किंवा खाणकाम या कारणांमुळे नष्ट झालेल्या वनस्पतीचे व अन्य झाडा-झुडपांचे उदा. वृक्ष, झुडपे आणि तत्सम अन्य वनस्पती यांचे पूर्वेक्षण लायसनधारकांकडून किंवा खाणकाम पट्टा धारकाकडून, त्याच क्षेत्रात (पुनर्वसनाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीद्वारे किंवा अन्यथा) ज्या रीतीने पुनर्वसन केले जाईल ती रीत ;]

(द) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**भारताच्या क्षेत्रीय जलधीच्या किंवा सागरमग्न खंडभूमीच्या संबंधात पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे देण्यासाठी नियम करण्याची केंद्र सरकारची शक्ती.**

[4][१३क. (१) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, भारताच्या क्षेत्रीय जलधीच्या किंवा त्याच्या सागरमग्न खंडभूमीच्या आतील सागराखाली असलेल्या कोणत्याही खनिजांच्या संबंधात, पूर्वेक्षण लायसनें किंवा खाणकाम पट्टे देण्यासाठी नियम करू शकेल.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील :—

(क) ज्या शर्तींच्या, मर्यादांच्या आणि निर्बंधाच्या अधीनतेने, अशी पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे देता येतील त्या शर्ती, मर्यादा आणि ते निर्बंध;

(ख) भारताच्या क्षेत्रीय जलधीच्या किंवा सागरमग्न खंडभूमीच्या आतील खनिजांचे समन्वेषण आणि समुपयोजन यांचे विनियमन करणे;

(ग) अशा समन्वेषणामुळे किंवा समुपयोजनामुळे नौकानयनात अडथळा होणार नाही अशी व्यवस्था करणे ; आणि

(घ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.]

**[5][कलमे ५ ते १३] किरकोळ खनिजांना लागू नसणे.**

१४. कलमे [5][५ ते १३] दोन्ही धरून यांचे उपबंध किरकोळ खनिजांच्या बाबतीत [6][दगड-खाणकाम पट्ट्यांना, खाणकाम पट्ट्यांना किंवा अन्य खनिजविषयक परवान्यांना] लागू असणार नाहीत.

**किरकोळ खनिजांच्या बाबतीत नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.**

१५. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, किरकोळ खनिजांच्या बाबतीत [7][दगडखाणकाम पट्टे, खाणकाम पट्टे आणि अन्य खनिजविषयक परवाने] देण्याचे विनियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित प्रयोजनांसाठी नियम करू शकेल.

[8][(१क) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न पोचवता, अशा नियमांत पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता उपबंध करता येतील :—

(क) दगडखाण पट्टे, खाणकाम पट्टे किंवा अन्य खाणकाम सवलती यांसाठी ज्या व्यक्तीस व ज्या रीतीने अर्ज करता येईल ती व्यक्ती व ती रीत आणि त्यासाठी द्यावी लागणारी फी;

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम ११ (तीन) अन्वये वगळण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ११ (चार) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
३. वरील अधिनियमाच्या कलम ११ (पाच) अन्वये समाविष्ट करण्यात आले.
४. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ६ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.
५. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १२ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
६. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ७ द्वारे "पूर्वेक्षण लायसनांना व खाणकाम पट्ट्यांना" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
७. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे "पूर्वेक्षण लायसने व खाणकाम पट्टे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
८. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १५ (क) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(ख) कोणताही असा अर्ज मिळाल्याची पोचपावती ज्या कालावधीत व ज्या नमुन्यात देता येईल तो कालावधी व तो नमुना ;

(ग) एकाच दिवसात एकाच जमिनीच्या बाबतीत अर्ज येतील तेव्हा विचारात घेतल्या जातील अशा बाबी ;

(घ) ज्या अटींवर व ज्या शर्तींना अधीन राहून आणि ज्या प्राधिकरणास दगडखाण पट्टा, खाणकाम पट्टा किंवा अन्य खाणकाम सवलती यांना मान्यता देता येईल किंवा त्यांचे नवीकरण करता येईल त्या अटी, शर्ती आणि ते प्राधिकरण ;

(ङ) दगडखाण पट्टा, खाणकाम पट्टा किंवा अन्य खाणकाम सवलती मिळवण्याची कार्यपद्धती ;

(च) दगडखाण पट्टाधारक, खाणकाम पट्टाधारक किंवा अन्य खाणकाम सवलतीधारक यांनी खाणकामाशी संबंधित कोणत्याही बाबींकरिता संशोधन किंवा प्रशिक्षण हाती घेण्याच्या प्रयोजनार्थ शासनाकडून प्रतिनियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीस मिळवून द्यावयाच्या सुविधा ;

(छ) भाडे, स्वामित्वधन, फी, बुडीत भाडे, दंड किंवा अन्य आकार ठरविणे व त्यांची वसुली आणि ज्या कालावधीत आणि ज्या रीतीने ते प्रदेय असतील, तो कालावधी व ती रीत ;

(ज) कोणतेही पूर्वेक्षण किंवा खाणकाम या कारणामुळे एखाद्या त्रयस्थ पक्षावर बाधक परिणाम झाला असेल त्या प्रकरणात, त्या त्रयस्थ पक्षाच्या अधिकारांचे (नुकसानभरपाईच्या प्रदानाद्वारे किंवा अन्यथा) ज्या रीतीने संरक्षण करता येईल ती रीत ;

(झ) कोणतेही दगडखाणकाम किंवा खाणकाम या कारणामुळे वनस्पती किंवा अन्य झाडे झुडपे उदा. वृक्ष, झुडपे आणि तत्सम वनस्पती नष्ट झाल्या असतील तर, त्याच क्षेत्रात, किंवा राज्य शासनाने निवडलेल्या अन्य कोणत्याही क्षेत्रात, (पुनर्वसनाच्या खर्चाच्या प्रतिपूर्ती द्वारे किंवा अन्यथा) पूर्वेक्षण लायसनधारकाकडून किंवा खाणकाम पट्टाधारकाकडून वनस्पतीचे आणि अन्य झाडे झुडपे यांचे ज्या रीतीने पुनर्वसन करण्यात येईल ती रीत ;

(ञ) ज्या रीतीने व ज्या शर्तींना अधीन राहून दगडखाण पट्टा, खाणकाम पट्टा किंवा अन्य खाणकाम सवलती हस्तांतरित करता येतील, ती रीत व त्या शर्ती;

(ट) एखाद्या दगडखाण पट्ट्यात किंवा खाणकाम पट्ट्यात किंवा अन्य खाणकाम सवलती यात समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमिनीवर खाणकामाच्या प्रयोजनार्थ, रस्ते, वीज पारेषण तारमार्ग, ट्राममार्ग, रेल्वेमार्ग, हवाई रज्जूमार्ग, नळमार्ग यांचे बांधकाम करणे व परिरक्षण करणे आणि पाण्यासाठी मार्ग तयार करणे;

(ठ) या अधिनियमान्वये ठेवावयाच्या नोंदवह्यांचा नमुना ;

(ड) दगडखाण पट्टाधारक किंवा खाणकाम पट्टाधारक किंवा अन्य खाणकाम सवलतीधारक यांना सादर करावयाचे अहवाल व विवरणपत्रे आणि त्या प्राधिकरणाकडे असे अहवाल व विवरणपत्रे सादर करावयाची ते प्राधिकरण;

(ढ) या अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाच्या पुनरीक्षणाकरिता ज्या कालावधीत व ज्या रीतीने व ज्या प्राधिकरणाकडे अर्ज करावयाचा तो कालावधी, ती रीत व ते प्राधिकरण, व त्यासाठी द्यावी लागणारी फी व पुनरीक्षण प्राधिकरणाच्या शक्ती, आणि

(ण) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब;

(२) पोटकलम (१) अन्वये नियम करण्यात येईपर्यंत, किरकोळ खनिजांच्या बाबतीत [१][दगड-खाणकाम पट्टे, खाणकाम पट्टे किंवा अन्य खनिजविषयक परवाने] देण्याचे विनियमन करण्यासाठी राज्य शासनाने केलेले जे कोणतेही नियम या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असतील ते नियम अंमलात असण्याचे चालू राहील.

[२][(३) पोटकलम (१) अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाखाली दिलेला खाणकाम पट्टा किंवा अन्य कोणताही खनिजविषयक परवाना धारण करणारी व्यक्ती, तिने अथवा तिच्या एजंटाने, व्यवस्थापकाने, कर्मचाऱ्याने, कंत्राटदाराने किंवा पोटपट्टेदाराने नेलेल्या किंवा वापरलेल्या किरकोळ खनिजांच्याबाबतीत, राज्य शासनाने किरकोळ खनिजांच्या बाबतीत केलेल्या नियमांत त्या त्या वेळी विहित केलेल्या दराने स्वामित्वधन [३][किंवा ठोकबंद भाडे यापैकी जे अधिक असेल ते] देईल :

---

१. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ८ द्वारे "पूर्वेक्षण लायसने व खाणकाम व खाणकाम पट्टे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे हे पोट-कलम (भूतलक्षी प्रभावाने) समाविष्ट करण्यात आले.

३. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १३ (ख) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

परंतु, राज्य शासनास कोणत्याही किरकोळ खनिजाच्या बाबतीत [१][तीन वर्षांच्या] कोणत्याही कालावधीमध्ये एकापेक्षा अधिक वेळा स्वामित्वधनाचा [२][किंवा ठोकबंद भाड्याचा] दर वाढवता येणार नाही.]

दिनांक २५ ऑक्टोबर १९४९ पूर्वी दिलेल्या खाणकाम पट्ट्यात फेरबदल करण्याची शक्ती.

१६. [३][(१) (क) "खाण व खनिज (विनियमन व विकास) विशोधन अधिनियम, १९७२" याच्या प्रारंभापूर्वी दिलेले सर्व खाणकाम पट्टे अशा प्रारंभीच्या वेळी अंमलात असतील तर, ते सर्व पट्टे अशा प्रारंभापासून सहा महिन्याच्या आत किंवा केंद्र सरकार सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा आणखी कालावधीच्या आत या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधांशी अनुरूप करून घेण्यात येतील. १९७२ चा ५६.

(ख) एखाद्या इस्टेटीच्या किंवा भूधृतीच्या मालकाने "खाण व खनिज (विनियमन व विकास) विशोधन अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभापूर्वी दिलेल्या कोणत्याही खाणकाम पट्ट्याखालील अधिकार हे, इस्टेटीचे किंवा भूधृतीचे संपादन करण्याविषयी किंवा कृषिभूमिहक्कविषयक सुधारणांविषयी तरतूद असणाऱ्या कोणत्याही प्रांतिक किंवा राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही अधिनियमाच्या उपबंधांच्या अनुरोधाने, दिनांक २५ ऑक्टोबर १९४९ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाकडे निहित झालेले असतील तर, असा खाणकाम पट्टा, "खाण व खनिज (विनियमन व विकास) विशोधन अधिनियम, १९७२" याच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या आत किंवा केंद्र सरकार सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा आणखी कालावधीच्या आत या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधाशी अनुरुप करून घेण्यात येईल. १९७२ चा ५६. १९७२ चा ५६.

[४](२) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पोटकलम (१) च्या उपबंधाची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करू शकेल आणि विशेषत: अशा नियमांत पुढील बाबींसाठी उपबंध करण्यात येतील :—

(क) कोणत्याही विद्यमान खाणकाम पट्ट्यात फेरबदल किंवा फेरफार करण्याचे योजिले असेल तेव्हा, नियोजित फेरबदलांची किंवा फेरफारांची पट्टेदारास, आणि पट्टाकार म्हणजे केंद्र सरकार नसेल तेव्हा, पट्टाकार व्यक्तीसदेखील आगाऊ नोटीस देऊन त्यास प्रस्तावाविरुद्ध कारणे दाखवण्याची संधी देणे;

(ख) विद्यमान खाणकाम पट्ट्यात समाविष्ट असलेले कोणतेही क्षेत्र कमी करण्यात आल्यास त्या बाबतीत, पट्टेदारास भरपाई देणे, आणि

(ग) उक्त भरपाई ज्या तत्त्वावर, ज्या रीतीने आणि ज्या प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल ती तत्त्वे, ती रीत व ते प्राधिकरण.

**विवक्षित प्रकरणात पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे हाती घेण्याची केंद्र सरकारची विशेष शक्ती**

विवक्षित जमिनींमध्ये पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे हाती घेण्याची केंद्र सरकारची विशेष शक्ती.

**१७.** (१) या कलमाचे उपबंध ज्या जमिनीतील खनिजे एखाद्या राज्याच्या शासनाकडे [४][किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडे] निहित असतील

[५] . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . त्या जमिनीच्या संबंधात लागू होतील.

(२) या अधिनियमांत काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकार, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, जे कोणतेही क्षेत्र कोणत्याही पूर्वेक्षण लायसनाखाली किंवा खाणकाम पट्ट्याखाली यापूर्वीच धारण करण्यात आले नसेल अशा कोणत्याही क्षेत्रात पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे हाती घेऊ शकेल, आणि केंद्र सरकार तसे करावयाचे योजील तेव्हा, ते शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे,—

(क) अशा क्षेत्राच्या सीमा विनिर्दिष्ट करील;

(ख) त्या क्षेत्रात पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे पार पाडण्यात येणार आहेत किंवा कसे ते नमूद करील; आणि

(ग) ज्या कोणत्याही खनिजाच्या किंवा खनिजांच्या बाबतीत अशी कामे पार पाडण्यात येणार असतील ते खनिज किंवा ती खनिजे विनिर्दिष्ट करील.

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १३ (ख) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाचे कलम १३ (ख) (दोन) (क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ९ द्वारे पोट-कलम (१) ऐवजी हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

४. १९७२ चा अधिनियम ५६, कलम १० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. १९७२ चा अधिनियम ५६, कलम १० द्वारे "फक्त" हा शब्द वगळण्यात आला.

(३) जेव्हा पोटकलम (२) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून, केंद्र सरकार कोणत्याही क्षेत्रात पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे हाती घेईल तेव्हा, एखाद्या खाजगी व्यक्तीने एखाद्या पूर्वेक्षण लायसनाखाली किंवा खाणकाम पट्ट्याखाली अशी पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे हाती घेतली असती तर या अधिनियमान्वये ज्या दराने पूर्वेक्षण फी, स्वामित्वधन, भूपृष्ठ भाडे किंवा, प्रकरणपरत्वे, ठोकबंद भाडे द्यावे लागले असते त्याच दराने अशी पूर्वेक्षण फी, स्वामित्वधन, भूपृष्ठ भाडे किंवा ठोकबंद भाडे देण्यास केंद्र सरकार पात्र ठरेल.

(४) पोटकलम (२) अन्वये आपणास प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करणे शक्य व्हावे म्हणून केंद्र सरकार, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही जमिनीच्या बाबतीत कोणतेही पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देण्यात येणार नाही असे घोषित करू शकेल.

[1][१७क. (१) केंद्र सरकारला, कोणत्याही खनिजाचे संधारण करण्याच्या हेतूने व राज्य शासनाशी विचारविनिमय केल्यावर, जे कोणतेही क्षेत्र पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकामपट्टा याखाली पूर्वी आलेले नाही, अशा क्षेत्राचे आरक्षण करता येईल आणि, ज्या क्षेत्राचे तसे आरक्षण करण्याचे केंद्र शासन योजील, अशा क्षेत्राच्या सीमारेषा व ज्या खनिजाच्या किंवा खनिजांच्या बाबतीत ते क्षेत्र आरक्षित ठेवण्यात येणार असेल ते खनिज किंवा खनिजे केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील. संधारणाच्या प्रयोजनार्थ क्षेत्राचे आरक्षण करणे.

(२) राज्य शासनाला, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेसह, जे कोणतेही क्षेत्र पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा याखाली आले नसेल अशा क्षेत्रात शासकीय कंपनी किंवा शासनाच्या मालकीचे किंवा शासनाकडून नियंत्रित केले जाणारे महामंडळ, यांच्याकडून पूर्वेक्षणाचे किंवा खाणकामाचे काम हाती घेतले जावे यासाठी त्या क्षेत्राचे आरक्षण करता येईल आणि केंद्र सरकार तसे करावयाचे योजील तेव्हा ते शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा क्षेत्राच्या सीमारेषा व ज्या खनिजासाठी किंवा खनिजांसाठी असे क्षेत्र आरक्षित ठेवण्यात येणार असेल ते खनिज किंवा खनिजे विनिर्दिष्ट करील.

(३) पोटकलम (२) द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून राज्य शासन ज्या क्षेत्रातील खनिजे एखाद्या खाजगी व्यक्तीकडे निहित असतील अशा कोणत्याही क्षेत्रात, पूर्वेक्षण किंवा खाणकाम हाती घेईल तेव्हा, एखाद्या खाजगी व्यक्तीने, पूर्वेक्षण लायसनाखाली किंवा खाणकाम पट्ट्याखाली अशी पूर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे हाती घेतली असती, तर, या अधिनियमान्वये ज्या दराने पूर्वेक्षण फी, स्वामित्वधन, भूपृष्ठ भाडे किंवा ठोकबंद भाडे देय झाले असते तेवढ्याच दराने वेळोवेळी ते देण्याची राज्य शासनाची जबाबदारी राहील.]

१८. (१) [2][भारतातील खनिजांचे संरक्षण व पद्धतशीर विकास करण्यासाठी आणि पूर्वेक्षण किंवा खाणकाम यामुळे होणाऱ्या प्रदूषणास प्रतिबंध करून किंवा त्याचे नियंत्रण करून त्याद्वारे पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी] आवश्यक असतील अशा सर्व उपाययोजना करणे हे केंद्र सरकारचे कर्तव्य असेल आणि [3][अशा प्रयोजनासाठी] केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यास योग्य वाटतील असे नियम करू शकेल. खनिज विकास.

(२) विशेषतः, आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेस बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील :—

(क) कोणत्याही क्षेत्रात नवीन खाणी सुरू करणे आणि तेथे खाणकामांचे विनियमन करणे;

(ख) कोणत्याही खाणीतून खनिजांचे उत्खनन किंवा त्यांचा संग्रह यांचे विनियमन करणे;

(ग) धातुकांचे संस्करण (बेनिफीसिएशन) करण्याच्या प्रयोजनासाठी खाणमालकांनी करावयाच्या उपाययोजना—यात अशा प्रयोजनासाठी योग्य त्या यंत्रसाधनांची व्यवस्था करण्याचा समावेश होतो;

(घ) कोणत्याही क्षेत्रातील खनिज साधनसंपत्तीचा विकास;

(ङ) सर्व नवीन विंधणकामे (बोअरिंग्ज) व कूपकांची खोदकामे (शॅफ्टसिंकिंग्ज) अधिसूचित करणे आणि विंधणविवरांचे (बोअर होल्स) कागदपत्र आणि सर्व नवीन विंधणविवरांच्या क्रोडभागांचे (कोअर्स) नमुने जतन करून ठेवणे;

(च) खनिजे साठवून ठेवण्याकरिता करावयाच्या व्यवस्थेचे आणि कोणत्याही व्यक्तीला अशा खनिजांचा किती साठा जवळ ठेवता येईल त्याबाबत विनियमन करणे;

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १४ द्वारे जादा दाखल केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १५ (क) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १५ (क) (दोन) द्वारे "त्या प्रयोजनासाठी" या मजकुराऐवजी "अशा प्रयोजनासाठी" हा मजकूर समाविष्ट केला.

(छ) कोणत्याही खाणीतील खनिजांचे नमुने त्या खाणीच्या मालकाने सादर करणे आणि असे नमुने ज्या रीतीने व ज्या प्राधिकाऱ्याकडे सादर केले पाहिजेत ती रीत व तो प्राधिकारी आणि राज्य शासनाने किंवा त्याबाबतीत त्याने विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही प्राधिकरणाने कोणत्याही खाणीतील कोणत्याही खनिजांचे नमुने घेणे, आणि

(ज) खाण मालकांनी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी विशेष किंवा नियतकालिक विवरणे व अहवाल सादर करणे आणि अशी विवरणे व अहवाल ज्या नमुन्यात व ज्या प्राधिकरणाकडे सादर केले पाहिजेत तो नमुना, व ते प्राधिकरण.

[1][ (झ) पूर्वेक्षणाच्या कामाचे विनियमन;

(ञ) पूर्वेक्षणाच्या कामावर किंवा खाणकामावर देखरेख करण्याकरिता अर्हताप्राप्त भू-शास्त्रज्ञांना किंवा खाणकाम अभियंत्यांना नोकरीवर ठेवणे;

(ट) खाणींमध्ये करण्यात येणारे कोणतेही खाणकाम किंवा धातूशास्त्रीय काम यांपासून निघणारा गाळ किंवा टाकाऊ पदार्थ यांची विल्हेवाट लावणे किंवा ती काढून टाकणे;

(ठ) खनिजांचे संरक्षण किंवा त्यांचा पध्दतशीर विकास यांना बाधक ठरू नये म्हणून किंवा पूर्वेक्षण किंवा खाणकामामुळे होऊ शकणाऱ्या प्रदूषणास प्रतिबंध करून किंवा त्याचे नियंत्रण करून त्याद्वारे पर्यावरणाचे संरक्षण करता यावे म्हणून कोणत्याही खाणीच्या मालकाला विवक्षित गोष्टी करण्याचे किंवा त्या गोष्टींपासून दूर राहण्याचे निदेश ज्या रीतीने व ज्या प्राधिकरणांकडून देण्यात येतील, ती रीत व ते प्राधिकरण.

(ड) शासनाकडून विहित करण्यात येतील असे नकाशे, अभिलेखाच्या नोंदवह्या ठेवणे व त्या सादर करणे;

(ढ) पूर्वेक्षण किंवा खाणकाम करणाऱ्या व्यक्तींनी, त्या खाणकामातील किंवा भूशास्त्रातील त्यांनी केलेल्या कोणत्याही संशोधनासंबंधातील अभिलेख व अहवाल सादर करणे;

(ण) खाणकामाशी किंवा भूशास्त्राशी संबंधित बाबींमध्ये कोणतेही संशोधन किंवा प्रशिक्षण हाती घेण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र सरकारने प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना, पूर्वक्षण किंवा खाणकाम करणाऱ्या व्यक्तींनी सुविधा मिळवून देणे;

(त) या कलमान्वये तयार केलेल्या कोणत्याही नियमांचे व्यतिक्रमण केल्यास लादण्यात येणारा द्रव्यदंड ज्या रीतीने लादण्यात येईल ती रीत व त्याची कार्यपद्धती आणि असा द्रव्यदंड जे प्राधिकरण लादील ते प्राधिकरण;

(थ) या अधिनियमान्वये व त्याखाली केलेल्या नियमान्वये कोणत्याही प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे पुनरीक्षण करण्यासाठी करावयाचा अर्ज ज्या प्राधिकरणाकडे करावयाचा, ज्या कालावधीत आणि ज्या नमुन्यात व ज्या रीतीने करावयाचा, ते प्राधिकरण, तो कालावधी, तो नमुना व ती रीत; ]

(३) या कलमान्वये केलेले सर्व नियम शासनावर बंधनकारक असतील.

**भारतीय भूशास्त्रीय सर्वेक्षण संस्था, इत्यादींना अन्वेषण करण्यासाठी प्राधिकृत करण्याची शक्ती.**

[2][१८क. (१) ज्या जमिनीच्या संबंधात राज्य शासनाने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने कोणतेही पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा दिला आहे अशा कोणत्याही जमिनीत किंवा जमिनीखाली उपलब्ध असलेल्या कोणत्याही खनिजासंबंधी शक्य असेल तितकी निश्चित माहिती गोळा करणे भारतातील खनिजांचे संरक्षण व त्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे असे केंद्र सरकारचे मत होईल तेव्हा, आवश्यक असेल अशी माहिती मिळवण्याच्या प्रयोजनासाठी असे तपशीलवार अन्वेषण करण्याकरता, केंद्र सरकार भारतीय भूशास्त्रीय सर्वेक्षण संस्थेस किंवा याबाबत ते विनिर्दिष्ट करील अशा अन्य प्राधिकरणास किंवा यंत्रणेस प्राधिकृत करू शकेल :

परंतु, राज्य शासनाने, दिलेल्या पूर्वेक्षण लायसनांच्या किंवा खाणकाम पट्ट्यांच्या बाबतीत, राज्य शासनाशी विचारविनिमय केल्याखेरीज असा कोणताही प्राधिकार देता येणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणताही प्राधिकार देण्यात आल्यावर, भारतीय भूशास्त्रीय सर्वेक्षण संस्थेने किंवा विनिर्दिष्ट प्राधिकरणाने किंवा यंत्रणेने आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी व कामगारांनी पुढील गोष्टी करणे विधिसंमत असेल :—

(क) अशा जमिनीवर प्रवेश करणे;

(ख) अवमृदेत (सबसॉइल) खणणे किंवा विंधण करणे ;

(ग) अशा जमिनीत किंवा जमिनीखाली उपलब्ध असलेल्या कोणत्याही खनिजांचे परिमाण ठरवण्यासाठी आवश्यक अशी अन्य सर्व कृत्ये करणे;

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १५ (ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट केला.
२. १९७२ चा अधिनियम ५६, कलम ११ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(घ) ज्या जमिनीत कोणतीही खनिजे आढळण्याचे अपेक्षित असेल त्या जमिनीच्या सीमा निश्चित करणे ;

(ङ) अंतराअंतरावर किंवा सलग रेषेत खुणा ठेवून अशा सीमा चिन्हित करणे;

(च) जेव्हा अशा चिन्हित केलेल्या सीमारेषांच्या आधारे अन्यथा सर्वेक्षण पूर्ण करणे शक्य नसेल तेव्हा, कोणत्याही उभ्या पिकाचा, कुंपणाचा किंवा जंगलाचा कोणताही भाग कापून दूर करणे;

परंतु, अशा कोणत्याही प्राधिकरणास किंवा यंत्रणेस कोणत्याही इमारतीत किंवा राहत्या घराला जोडून असलेल्या आवारात किंवा बागेत (तेथील ताबाधारकाच्या संमतीखेरीज), अशा ताबाधारकाला तसे करण्याच्या आपल्या उद्देशाची निदान सात दिवसांची आगाऊ लेखी नोटीस दिल्याशिवाय प्रवेश करता येणार नाही.

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाची कोणतीही कार्यवाही करावयाची असेल तेव्हा, केंद्र सरकार अशी कार्यवाही करण्यापूर्वी किंवा करण्याच्या वेळी, जे नुकसान होण्याची शक्यता असेल अशा सर्व अपरिहार्य नुकसानीच्या भरपाईसाठी पैसे देईल किंवा देऊ करील आणि अशा रीतीने दिलेल्या किंवा देऊ केलेल्या रकमेच्या पुरेसेपणाविषयी किंवा ती रक्कम कोणत्या व्यक्तीस द्यावयाची किंवा देऊ करावयाची याविषयी विवाद उपस्थित झाल्यास, केंद्र सरकार तो विवाद वादग्रस्त जमिनीवर अधिकारिता असलेल्या मूळ अधिकारितेच्या मुख्य दिवाणी न्यायालयाकडे निर्णयार्थ सोपवील.

(४) पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे असा कोणताही विवाद अस्तित्वात आहे या वस्तुस्थितीमुळे, पोटकलम (२) अन्वये कोणतीही कार्यवाही करण्यास प्रतिबंध होणार नाही.

(५) अन्वेषण पूर्ण केल्यानंतर, भारतीय भूशास्त्रीय सर्वेक्षण संस्था किंवा ज्या विनिर्दिष्ट प्राधिकरणाने किंवा यंत्रणेने अन्वेषण केले असेल ते प्राधिकरण किंवा ती यंत्रणा केंद्र सरकारास तपशीलवार अहवाल सादर करील आणि त्या अहवालात जमिनीत किंवा जमिनीखाली असलेल्या कोणत्याही खनिजाच्या साठ्याचे परिमाण व त्याचे स्वरूप नमूद करील.

(६) या कलमान्वये केलेल्या अन्वेषणाचा खर्च केंद्र सरकार सोसील :

परंतु, राज्य शासन किंवा ज्या व्यक्तीकडे खनिजे निहित झालेली असतील अशी अन्य व्यक्ती किंवा कोणताही पूर्वेक्षण लायसनधारक किंवा खाणकाम पट्टाधारक, पोटकलम (५) अन्वये सादर केलेल्या अहवालाची एक प्रत आपणास मिळविण्याविषयी केंद्र शासनाकडे अर्ज करील तेव्हा, ते राज्य शासन किंवा ती अन्य व्यक्ती किंवा प्रकरणपरत्वे, पूर्वेक्षण लायसनधारक किंवा खाणकाम पट्टाधारक याला, केंद्र सरकार याबाबतीत विनिर्दिष्ट करील असा अन्वेषणाच्या खर्चाचा वाजवी भाग सोसावा लागेल आणि अन्वेषण खर्च अंशतः भरल्यावर पोटकलम (५) अन्वये केंद्र सरकारकडे सादर करण्यात आलेल्या अहवालाची खरी प्रत केंद्र सरकारकडून मिळण्यास हक्कदार होईल.]

### संकीर्ण

**अधिनियमांचे उल्लंघन करून दिलेली पूर्वेक्षण लायसने व खाणकाम पट्टे शून्य असणे.**

१९. या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा दिलेल्या आदेशांच्या उपबंधाचे उल्लंघन करून दिलेले, नूतनीकरण केलेले किंवा संपादन केलेले कोणतेही पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा शून्य व प्रभावहीन ठरेल.

**स्पष्टीकरण.**—एखाद्या व्यक्तीने कोणत्याही राज्यात एकापेक्षा अधिक पूर्वेक्षण लायसने किंवा खाणकाम पट्टे संपादित केले असतील आणि अशा लायसनांसाठी किंवा प्रकरणपरत्वे, पट्ट्याखाली व्यापले जाणारे एकूण क्षेत्र कलम ६ अन्वये अनुज्ञेय असलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा अधिक होत असेल तेव्हा, केवळ ज्या पूर्वेक्षण लायसनाच्या किंवा खाणकाम पट्ट्याच्या संपादनामुळे असे क्षेत्र कमाल मर्यादेपेक्षा अधिक झाले असेल तेवढेच पूर्वेक्षण लायसन किंवा तेवढाच खाणकाम पट्टा शून्य असल्याचे मानले जाईल.

**अधिनियम व नियम हे पूर्वेक्षण लायसनांच्या व खाणकाम पट्ट्यांच्या सर्व नूतनीकरणास लागू होणे.**

२०. या अधिनियमाचे आणि त्याखाली केलेल्या नियमांचे उपबंध या अधिनियमाच्या प्रारंभानंतर दिलेल्या पूर्वेक्षण लायसनाच्या किंवा खाणकाम पट्ट्याच्या नूतनीकरणाच्या बाबतीत जसे लागू होतात तसेच ते अशा प्रारंभापूर्वी दिलेल्या कोणत्याही पूर्वेक्षण लायसनाच्या किंवा खाणकाम पट्ट्याच्या अशा प्रारंभानंतर केल्या जाणाऱ्या नूतनीकरणाच्या बाबतीत लागू होतील.

**शिक्षा.**

२१. [1][(१) जो कोणी कलम ४, पोटकलम (१) च्या उपबंधांचे उल्लंघनकरील त्यास [2][दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची, किंवा दहा हजार रुपयापर्यंत] असू शकेल इतक्या दंडाची, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

---

१. १९७२ चा अधिनियम ५६, कलम १२ अन्वये मूळ पोटकलम (१) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

२. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १६ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये केलेल्या कोणत्याही नियमात अशीही तरतूद करता येईल की, अशा नियमांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन केल्याबद्दल कोणतीही व्यक्ती [1][एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस, किंवा पाच हजार रुपयांपर्यंत] असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्हीही शिक्षांस आणि उल्लंघन चालू राहिल्याचे बाबतीत, अशा पहिल्या उल्लंघनाबद्दल दोषी ठरवण्यात आल्यावर ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसागणिक आणखी [2][पाचशे रुपयापर्यंत] असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

[3][(३) कोणतीही व्यक्ती कलम ४, पोटकलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन करून कोणत्याही जमिनीवर अपप्रवेश करील तेव्हा, राज्य शासनास किंवा याबाबतीत त्या शासनान प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास अशा रीतीने अपप्रवेश करणाऱ्या व्यक्तिवर, बेदखलीचा आदेश बजावता येईल, आणि राज्य शासनास किंवा अशा प्राधिकृत प्राधिकाऱ्यास, अशा रीतीने अपप्रवेश करणाऱ्या व्यक्तीला जमिनीतून बेदखल करण्यासाठी, आवश्यक असेल तर, पोलिसांची मदत मिळवता येईल.

(४) जेव्हा जेव्हा कोणतीही व्यक्ती कोणत्याही वैध प्राधिकाराशिवाय कोणत्याही जमिनीतून कोणतेही खनिज काढील, आणि त्या प्रयोजनासाठी अशा जमिनीवर कोणतीही हत्यारे, सामग्री, वाहन किंवा अन्य कोणतीही वस्तू आणील तेव्हा तेव्हा, असे खनिज, हत्यार, सामग्री, वाहन किंवा अन्य वस्तू ही, याबाबत खास शक्ती प्रदान केलेल्या [4][अधिकाऱ्यांकडून किंवा प्राधिकरणाकडून] जप्त केली जाण्यास पात्र ठरेल.

(५) जेव्हा जेव्हा कोणतीही व्यक्ती कोणत्याही वैध प्राधिकाराशिवाय कोणत्याही जमिनीतून कोणतेही खनिज काढील तेव्हा तेव्हा, राज्य शासनास अशा रीतीने काढलेले खनिज अशा व्यक्तीकडून परत मिळवता येईल. किंवा अशा खनिजांची आधीच विल्हेवाट लावण्यात आली असेल तर, त्याची किंमत त्या व्यक्तीकडून वसूल करता येईल. आणि तसेच ज्या कालावधीसाठी अशा व्यक्तीने कोणत्याही वैध प्राधिकाराशिवाय ती जमीन ताब्यात ठेवली असेल, त्या कालावधीबद्दल त्या व्यक्तीकडून भाडे, स्वामित्वधन किंवा प्रकरणपरत्वे, कर वसूल करता येईल.]

[5][(६) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (१) खालील अपराध हा दखलपात्र असेल.]

**अपराधांची दखल घेणे.** २२. केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडून लेखी तक्रार आल्याखेरीज कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये.

**कंपन्यांनी केलेले अपराध.** २३. (१) या अधिनियमाखालील किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांखालील अपराध करणारी व्यक्ती ही एखादी कंपनी असेल तर, असा अपराध घडला त्यावेळी ज्या व्यक्तीकडे अशा कंपनीचा प्रभार होता आणि जी कंपनीचे कामकाज चालवण्याबाबत कंपनीस जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि तिच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व तदनुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र ठरेल :

परंतु, असा अपराध आपल्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे योग्य ती तत्परता दाखवली होती असे त्या व्यक्तीने सिद्ध केले तर, या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही असले तरी, या अधिनियमाखालील अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकसंमतीने घडला असेल तेव्हा, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व तदनुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) "कंपनी" या शब्दाचा अर्थ, कोणताही निगम-निकाय असा होतो, आणि त्यात पेढीचा किंवा अन्य व्यक्तीसंघाचा समावेश होतो ;

(ख) एखाद्या पेढीच्या संबंधात "संचालक" या शब्दाचा अर्थ, त्या पेढीचा भागीदार असा होतो.

---

१. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १६ (ख) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १६ (ख) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. १९७२ चा अधिनियम ५६, कलम १२ अन्वये ही पोटकलमे समाविष्ट करण्यात आली.

४. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १६ (ग) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम १६ (घ) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[1][२३क. (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाच्या संबंधात न्यायालयाकडे तक्रार करण्यासाठी कलम २२ अन्वये प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस, खटला दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर ती विनिर्दिष्ट करील इतकी रक्कम शासनाकडे जमा करण्याकरिता दिला देण्यात आल्यावर, तो अपराध आपसात मिटवता येईल : अपराध आपसात मिटविणे.

परंतु, केवळ दंडाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाच्या बाबतीत, अशी कोणतीही रक्कम, त्या अपराधाबद्दल जितका जास्तीत जास्त दंड करता येईल तितक्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये एखादा अपराध आपसात मिटवण्यात आला असेल तेव्हा, अशारितीने मिटवण्यात आलेल्या अपराधाच्या बाबतीत अपराधाविरुद्ध कोणतीही कारवाई किंवा, प्रकरणपरत्वे, पुढील कारवाई करण्यात येणार नाही, आणि अपराधी हवालतीत असेल तर, त्यास तावडतोब सोडून देण्यात येईल.]

२४. (१) कोणत्याही खाणीच्या किंवा सोडून दिलेल्या खाणीच्या प्रत्यक्ष किंवा संभाव्य खाणकामाच्या स्थितीची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी अथवा या अधिनियमाशी किंवा त्याखाली केलेल्या नियमांशी संबंधित असलेल्या अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी, केंद्र सरकारने या बाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस,— प्रवेश करण्याची व तपासणी करण्याची शक्ती.

(क) कोणत्याही खाणीत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल ;

(ख) अशा कोणत्याही खाणीत सर्वेक्षण करता येईल व मोजमापे घेता येतील ;

(ग) कोणत्याही खाणीत असलेल्या खनिजाच्या साठ्याचे वजन करता येईल, तो मोजता येईल किंवा त्याची मोजमापे घेता येतील ;

(घ) कोणत्याही खाणीवर नियंत्रण असलेल्या किंवा अशा खाणीशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात किंवा अधिकाराखाली असलेला कोणताही दस्तऐवज, पुस्तक, नोंदवही किंवा अभिलेख तपासता येईल आणि त्यावर ओळखचिन्हे लावता येतील, आणि अशा दस्तऐवजातून, पुस्तकातून, नोंदवहीतून किंवा अभिलेखातून उतारे घेता येतील किंवा त्याच्या प्रती काढता येतील ;

(ङ) खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे असलेला असा कोणताही दस्तऐवज, पुस्तक, नोंदवही किंवा अभिलेख हजर करण्याचा आदेश देता येईल; आणि

(च) कोणत्याही खाणीवर नियंत्रण असलेल्या किंवा खाणीशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीची तपासणी करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये केंद्र सरकारने प्राधिकृत केलेली प्रत्येक व्यक्ती ही "भारतीय दंड संहिता" कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहे असे मानले जाईल, आणि त्या पोटकलमाच्या खंड (ङ) किंवा खंड (च) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीच्या आधारे ज्या व्यक्तीवर आदेश किंवा समन्स काढण्यात आले असेल अशी प्रत्येक व्यक्ती अशा आदेशाचे किंवा प्रकरणपरत्वे, समन्सचे पालन करण्यास विधितः बांधलेली असेल.

[2][२४अ. (१) या अधिनियमान्वये आणि त्याखाली केलेल्या नियमान्वये पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकाम पट्टा देण्यात आल्यानंतर असा, लायसन धारक किंवा पट्टाधारक, त्याचे अभिकर्ते किंवा त्याचे नोकर, किंवा कामगार यांनी, ज्या जमिनीकरिता असा पट्टा किंवा लायसन देण्यात आले असेल त्या जमिनीवर, तो पट्टा किंवा लायसन चालू असण्याच्या काळात, सर्व वेळी प्रवेश करणे आणि विहित करण्यात येतील अशी सर्वेक्षणाची कामे किंवा खाणकामे करणे, हे विधिसंमत असेल : पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकामपट्टा धारकाचे अधिकार व दायित्वे.

परंतु, कोणतीही व्यक्ती कोणत्याही इमारतीमध्ये किंवा बंदिस्त आवारामध्ये किंवा राहत्या घरास लागू असलेल्या बागेमध्ये (त्या जागेच्या भोगवटादाराची संमती घेतली असेल त्या व्यतिरिक्त) अशा भोगवटादारास, त्या जागेत प्रवेश करण्याचा आपला हेतू लेखी नोटीशीद्वारे कमीत कमी सात दिवस आधी कळविल्याशिवाय, प्रवेश करू शकणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या पूर्वेक्षण लायसनधारक किंवा खाणकामपट्टाधारक, अशा लायसनअन्वये किंवा पट्टयान्वये त्याला मंजूर केलेल्या जमिनीच्या पृष्ठभागाच्या भोगवटादारास खाणकामामुळे किंवा पूर्वेक्षण कामामुळे किंवा त्यांच्या परिणामी, होणाऱ्या किंवा होऊ शकणाऱ्या तोट्यासाठी किंवा नुकसानासाठी भरपाई देण्यास पात्र असेल.

(३) पोटकलम (३) अन्वये देय असलेली भरपाईची रक्कम राज्य शासन विहित रीतीने निर्धारित करील.]

---

१. १९७२ चा अधिनियम, ५६, कलम १३ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.
२. १९८६ चा अधिनियम ३७, कलम १७ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

विवक्षित रकमा जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येतील.

२५. [1][(१)] या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये किंवा कोणत्याही पूर्वेक्षण लायसनाच्या किंवा खाणकाम पट्टयाच्या अटी व शर्ती याअन्वये शासनास देय असलेले कोणतेही भाडे, स्वामित्वधन कर, फी किंवा अन्य रक्कम ही, राज्य शासन याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिल्यावर, जमीन-महसुलाची थकबाकी ज्या रीतीने वसूल करण्यात येते त्याच रीतीने वसूल करता येईल,

[2][(२) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा कोणत्याही पूर्वेक्षण लायसनाच्या किंवा खाणकाम पट्टयाच्या अटी व शर्ती यांअन्वये शासनास देय असलेले कोणतेही भाडे, स्वामित्वधन, कर, फी किंवा अन्य रक्कम, राज्य शासन याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिल्यावर, ती जमीन-महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे त्याच रीतीने वसूल करता येईल आणि "खाण व खनिज (विनियमन व विकास) (विशोधन) अधिनियम, १९७२" याच्या प्रारंभानंतर शासनास देय होणारी अशी प्रत्येक रक्कम आणि तीवर देय असलेले व्याज, पूर्वेक्षण लायसनधारकाच्या किंवा, प्रकरणपरत्वे, खाणकाम भाडेपट्टाधारकाच्या मत्तेवरील प्रथम भार म्हणून असेल.] १९७२ चा ५६.

शक्तीचे प्रत्यायोजन.

२६. (१) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमान्वये त्यास वापर करता येण्याजोग्या कोणतीही शक्ती अशा, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात यईल—

(क) असा जो अधिकारी किंवा प्राधिकरण केंद्र सरकारास दुय्यम असेल त्यालासुद्धा; किंवा

(ख) अशा राज्य शासनाला किंवा असा जो अधिकारी किंवा प्राधिकरण राज्य शासनास दुय्यम असेल त्यालासुद्धा, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील त्या बाबींच्या संबंधात आणि अधिसूचनेत कोणत्याही शर्ती विनिर्दिष्ट केल्या असल्यास त्या शर्तींच्या अधीनतेने वापरता येतील.

(२) राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमान्वये त्यास वापर करता येण्याजोग्या कोणत्याही शक्ती, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल असा, राज्य शासनास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास देखील, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील त्या बाबींच्या संबंधात आणि अधिसूचनेत कोणत्याही शर्ती विनिर्दिष्ट केल्या असल्यास त्या शर्तींच्या अधीनतेने, वापरता येतील.

(३) या अधिनियमान्वये केंद्र सरकारने केलेल्या कोणत्याही नियमाद्वारे कोणत्याही राज्य शासनाकडे किंवा त्यास दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे शक्ती प्रदान करता येतील आणि कर्तव्ये नेमून देता येतील अथवा शक्ती प्रदान करण्याचे आणि कर्तव्ये नेमून देण्याचे प्राधिकृत करता येईल.

सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

२७. या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या अशा कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम आणि अधिसूचना संसदेपुढे मांडणे आणि विवक्षित नियम संसदेने मान्य करणे.

२८. [3][(१) या अधिनियमान्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम व काढलेली प्रत्येक अधिसूचना ही असा नियम किंवा अशी अधिसूचना करण्यात किंवा काढण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, त्याचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता ठेवण्यात येईल, आणि उपरोक्त अधिवेशनाच्या किंवा अशा क्रमवर्ती अधिवेशनांच्या लगत नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, अशा नियमात किंवा अधिसूचनेत कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, तो नियम किंवा ती अधिसूचना त्यानंतर केवळ अशा रीतीने फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल, अथवा असा नियम किंवा अशी अधिसूचना करण्यात किंवा काढण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, तो नियम किंवा ती अधिसूचना मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल केल्यामुळे किंवा ती रद्द केल्यामुळे तत्पूर्वी अशा नियमान्वये किंवा अधिसूचनेन्वये केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या वैधतेस बाध येणार नाही.]

(२) नियम करण्यासंबंधी केंद्र सरकारकडे निहित असलेल्या शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, कलम १६, पोटकलम (२), खंड (ग) च्या संदर्भात केलेले कोणतेही नियम, संसदेच्या प्रत्येक सभागृहाकडून, फेरबदलांसह किंवा त्याविना मान्य करण्यात येईपर्यंत अंमलात येणार नाहीत.

---

१. १९७२ चा अधिनियम ५६, कलम १४ द्वारे कलम २५ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाचे कलम ५६, कलम १४ द्वारे हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

३. १९७२ चा अधिनियम ५६, कलम १५ अन्वये मूळ पोटकलम (१) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

१९४८ चा ५३. २९. "खाण व खनिज (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८" याखाली जे नियम केलेले असतील किंवा केले असल्याचे दिसत असतील ते सर्व नियम या अधिनियमान्वये ज्या बाबींसाठी तरतूद करण्यात आली असेल त्या बाबींशी जेथवर संबंधित असतील व या अधिनियमाशी विसंगत नसतील तेथवर ते, ज्या तारखेस असे नियम करण्यात आले असतील त्या तारखेस जणु हा अधिनियम अंमलात असावा त्याप्रमाणे या अधिनियमाखाली केले असल्याचे मानले जाईल आणि या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही नियमांद्वारे निष्प्रभावी होईपर्यंत ते अंमलात राहतील. — विद्यमान नियम चालू राहणे.

३०. राज्य शासनाने किंवा अन्य प्राधिकरणाने या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करीत असताना दिलेल्या कोणत्याही आदेशाचे केंद्र सरकारास आपण होऊन किंवा व्यथित झालेल्या पक्षाने विहित मुदतीच्या आत केलेल्या अर्जावरून पुनरीक्षण करता येईल. — केंद्र शासनाची पुनरीक्षण करण्याची शक्ती.

[1][ ३०क. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ९, पोटकलम (१) आणि कलम १६, पोटकलम (१) चे उपबंध दगडी कोळशाच्या बाबतीत दिनांक २५ ऑक्टोबर १९४९ पूर्वी देण्यात आलेल्या खाणकाम भाडेपट्टयांना किंवा त्यांच्या संबंधात लागू होणार नाहीत, परंतु, तसे करणे इष्ट आहे अशी केंद्र सरकारची खात्री झाली तर, ते शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, उक्त सर्व किंवा त्यापैकी कोणतेही उपबंध (कलमे १३ व १८ खाली केलेले कोणतेही नियम धरून) त्या किंवा नंतरच्या कोणत्याही अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे काही अपवाद आणि फेरबदल असल्यास त्यांच्या अधीनतेने, अशा भाडेपट्टयांना किंवा त्यांच्या संबंधात लागू होतील.] — दिनांक २५ ऑक्टोबर १९४९ पूर्वी दिलेल्या दगडी कोळशाच्या खाणकाम पट्ट्यासंबंधीचे विशेष उपबंध.

३१. खनिज विकासाच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे केंद्र सरकारचे मत झाले असेल तर, त्यास लेखी आदेशाद्वारे आणि कारणे लेखी नमूद करून कोणत्याही प्रकरणांत कोणतेही पूर्वेक्षण लायसन किंवा खाणकामपट्टा देणे, त्याचे नूतनीकरण करणे किंवा तो हस्तांतरित करणे, अथवा कोणतेही खनिज शोधण्याच्या किंवा मिळवण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही खाण चालवणे हे कलम १३ खाली केलेल्या नियमांमध्ये निर्धारित केलेल्या अटी व शर्ती यांपेक्षा निराळ्या अटींवर व शर्तींवर प्राधिकृत करू शकेल. — विशेष प्रकरणामध्ये नियम शिथील करणे.

१९४८ चा ५३. ३२. (१९४८ चा अधिनियम ५३ यात विशोधने.) निरसन व विशोधन अधिनियम, १९६० (१९६० चा ५८) कलम २ आणि अनुसूची एक याद्वारे निरसित.

१९४८ चा ५३. ३३. "खाण व खनिज (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८" अन्वये, शासनाने किंवा शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाने, खाणीचे विनियमन आणि खनिजांचा विकास करण्याच्या संबंधात दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी सुरू होणाऱ्या व या अधिनियमाच्या आरंभाच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेली सर्व कृत्ये, दाखल केलेल्या कार्यवाही आणि दिलेले शिक्षादेश ही, जर अशी कृत्ये, कार्यवाही किंवा शिक्षादेश उक्त अधिनियमान्वये करण्यात, दाखल करण्यात किंवा देण्यात येत आहेत या समजुतीने सद्भावदर्शनी तशा समजुतीने केलेली किंवा दाखल केलेली किंवा दिलेली असतील. तर जणु ती सर्व कायद्यानुसार केलेली, दाखल केलेली किंवा दिलेली असावीत त्याप्रमाणे विधिग्राह्य असतील आणि प्रवर्तनात राहतील आणि अशी कोणतीही कृत्ये, कार्यवाही किंवा शिक्षादेश ही कायद्यानुसार केलेली, दाखल केलेली किंवा दिलेली नव्हती या कारणावरून कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा कोणतीही अन्य कार्यवाही दाखल करून घेण्यात येणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही. — विवक्षित कृत्य अधिग्रहण करणे व निस्तारण.

---

१. १९५० चा अधिनियम १५, कलम २ अन्वये हे कलम (भूतलक्षी प्रभावाने) समाविष्ट करण्यात आले.

[1][ पहिली अनुसूची

[ कलम ४(३), ५(१), ७(२) आणि ८(२) पहा. ]

**विनिर्दिष्ट खनिज**

१. ॲपेटाईट व फॉस्फेटिक धातुके.
२. ॲस्बेस्टॉस.
३. बराइट.
४. बॉक्साईट.
५. बेरिल व बेरिलियम असणारी अन्य खनिजे.
६. क्रोम धातुक.
७. दगडी कोळसा व लिग्नाइट.
८. तांबे.
९. डोलोमाइट.
१०. सोने.
११. जिप्सम.
१२. लोह धातुक.
१३. कायनाईट.
१४. शिसे.
१५. चुनखडक, भट्टीत जेव्हा त्याचा बांधकामाचे साहित्य म्हणून वापर केला जातो ते वगळून.
१६. लिथियम दिक्कोन खनिज.
१७. मॅग्नेसाइट.
१८. मॅगनीज धातुक.
१९. रेलर अर्थ गटात समाविष्ट असलेली युरेनियम व थोरीअम खनिजे.
२०. मोलीब्डेनम.
२१. निओबिअम असणारी खनिजे.
२२. निकेल धातुक.
२३. फॉस्फोराइटस आणि युरेनियम समाविष्ट असलेली अन्य फॉस्फेटीक धातुक.
२४. प्लॅटीनम व अन्य बहुमोल धातू व त्यांचे धातुक.
२५. पिचब्लेंड व अन्य युरेनियम धातुके.
२६. बहुमोल दगड.
२७. रुटाईल.
२८. चांदी.
२९. सिलीमानाईट.
३०. गंधक व त्याची धातुक.
३१. टॅंटॅलियम.
३२. कथिल.
३३. टंगस्टन धातुके.
३४. युरेनिफेरस अलानाइट, मोनॅझाईट आणि अन्य थोरियम खनिजे.
३५. तांबे व सोने गाळल्यानंतर, धातुकातून राहिलेले गाळसाळ असलेले युरेनियम, इल्मेनाइट आणि अन्य टिटॅनियम धातुके.
३६. व्हॅनॅडियम धातुके.
३७. जस्त.
३८. झिरकॉन. ]

---

१. १९८६ चा अधिनियम, ३७, कलम १८ अन्वये मूळ अनुसूची ऐवजी ही अनुसूची दाखल करण्यात आली.

[1][दुसरी अनुसूची

(कलम ९ पहा)

स्वामित्वधनाचे दर

| | | |
|---|---|---|
| १. | गोमेद .. .. .. | दर टनास पंचावन्न रुपये. |
| २. | सर्व मौल्यवान व कमी मौल्यवान दगड (गोमेद व हिरा वगळता). | खाणीतून काढते वेळीच्या विक्री किमतीच्या वीस टक्के. |
| ३. | ॲपेटाइट आणि फॉस्फेट खडक— | |
| | (क्) २७ टक्क्यांपेक्षा अधिक असलेली धातुके $P_2O_5$ | दर टनास पंचेचाळीस रुपये. |
| | (ख्) २० टक्के ते २७ टक्के असलेली धातुके $P_2O_5$ | दर टनास पंचवीस रुपये. |
| | (ग्) २० टक्क्यांपेक्षा कमी असलेली धातुके $P_2O_5$ | दर टनास दहा रुपये. |
| ४. | ॲस्बेस्टॉस : | |
| | (क्) क्रिसोटाइल .. .. | दर टनास दोनशे पच्याऐंशी रुपये |
| | (ख्) ॲंफिबोल .. .. .. | दर टनास पंधरा रुपये. |
| ५. | बराइट— | |
| | (क्) शुभ्र (हिमधवल आणि हिमशुभ्र धवल धरून) | दर टनास वीस रुपये |
| | (ख्) बदामी .. .. .. | दर टनास दहा रुपये. |
| ६. | बॉक्साइट .. .. .. | दर टनास दहा रुपये |
| ७. | कॅडमियम .. .. .. | धातुकाच्या दर टनास कॅडमियम धातुच्या प्रतिशत दर युनिट सोळा रुपये आणि हिस्से राशीच्या तत्त्वावर. |
| ८. | कॅल्साईट .. .. .. | दर टनास पंधरा रुपये |
| ९. | चिनी माती, कॅओलिनसुद्धा म्हणतात (शाडू धरून) | |
| | (क्) कच्ची .. .. | दर टनास आठ रुपये |
| | (ख्) प्रक्रिया झालेली (धुतलेली धरून) .. | दर टनास पस्तीस रुपये |
| १०. | क्रोमाइट (लुम्पी आणि संहतक दोन्ही) | |
| | (क्) ४८ टक्के व त्याहून अधिक $Cr_2O_3$ असलेले | दर टनास साठ रुपये |
| | (ख्) ४८ टक्क्यांपेक्षा कमी $Cr_2O_3$ आणि ४० टक्क्यांपेक्षा अधिक $Cr_2O_3$ असलेले | दर टनास तीस रुपये |
| | (ग्) ३० टक्के ते ४० टक्के $Cr_2O_3$ असलेले .. | दर टनास वीस रुपये |
| | (घ्) ३० टक्क्यांपेक्षा कमी $Cr_2O_3$ असलेले .. | दर टनास पाच रुपये |
| ११. | कोळसा— | |
| | (एक) गट एक दगडी कोळसा : | |
| | (क्) कोकी कोळसा स्टील प्रत एक स्टील प्रत दोन वॉशरी प्रत एक. (ख्) आसाममध्ये हाताने वेचलेला कोळसा | दर टनास सात रुपये] |
| | (दोन) गट दोन दगडी कोळसा : | |
| | (क्) कोकी कोळसा वॉशरी प्रत दोन, कोकी कोळसा वॉशरी प्रत तीन. (ख्) निम कोकी कोळसा प्रत एक, निम कोकी कोळसा प्रत दोन. (ग्) बिगर कोकी कोळसा प्रत ए, बिगर कोकी कोळसा प्रत बी. | दर टनास सहा रुपये पन्नास पैसे |

---

१. जी.एस.आर. ४५८ (इ.), दिनांक ५ मे, १९८७ याद्वारे दुसरी व तिसरी अनुसूची मूळ मजकुराऐवजी घातली,—

पहा, भारताचे राजपत्र, असाधारण, भाग (दोन), कलम ३(२), पृष्ठ ७ ते १०.

(ख) आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय आणि नागालँड येथील प्रतवारी न झालेला आर.ओ.एम. कोळसा. — दर टनास सहा रुपये पन्नास पैसे

(तीन) गट तीन दगडी कोळसा :

(क) कोकी कोळसा वॉशरी प्रत चार
(ख) बिगर कोकी कोळसा प्रत क } दर टनास पाच रुपये पन्नास पैसे.

(चार) गट चार कोळसा :

बिगर कोकी कोळसा प्रत घ
बिगर कोकी कोळसा प्रत ङ } दर टनास चार रुपये तीस पैसे

(पाच) गट पाच कोळसा :

बिगर कोकी कोळसा प्रत च
बिगर कोकी कोळसा प्रत छ] } दर टनास दोन रुपये पन्नास पैसे

(सहा) गट सहा कोळसा :

आंध्र प्रदेशातील कोळसा .. .. दर टनास पाच रुपये
(सिंगरानी कॉलरीज कंपनी लिमिटेड)

स्पष्टीकरण.—या बाबीच्या प्रयोजनासाठीं, अशा प्रत्येक कोळशाची प्रत ही कोळशाच्या खाणीबाबत नियंत्रण आदेश, १९४५ याच्या खंड ३ अन्वये विहित केल्याप्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| १२. | ताम्र धातुक .. .. .. | धातुकाच्या दर टनास ताम्र धातुच्या प्रतिशत दर युनिटला पाच रुपये आणि हिस्सेराशीच्या तत्त्वावर. |
| १३. | कोरंडम .. .. .. | दर टनास एकशे दहा रुपये. |
| १४. | हिरा .. .. .. | खाणीतून काढते वेळीच्या विक्री किंमतीच्या पंधरा टक्के. |
| १५. | डायास्पोर .. .. .. | दर टनास तीस रुपये |
| १६. | डोलामाईट .. .. .. | दर टनास आठ रुपये |
| १७. | फेलस्पार .. .. .. | दर टनास सहा रुपये |
| १८. | आगमाती [घंडणसुलभ, चिलिम, मुद्रणी आणि नैसर्गिक (पोझोलानिक माती) धरून.] | दर टनास पाच रुपये |
| १९. | फ्लुओरस्पार (फ्लुओराईट असेही म्हणतात) | |
| | (क) ८५ टक्के किंवा अधिक $CaF_2$ असलेले .. | दर टनास एकशे दहा रुपये. |
| | (ख) ७० टक्क्यांपेक्षा अधिक परंतु ८५ टक्क्यांपेक्षा कमी $CaF_2$ असलेले. | दर टनास पंच्याहत्तर रुपये. |
| | (ग) ३० टक्क्यांपेक्षा अधिक परंतु ७० टक्क्यांपेक्षा कमी $CaF_2$ असलेले. | दर टनास पन्नास रुपये. |
| | (घ) ३० टक्के किंवा त्यापेक्षा कमी $CaF_2$ असलेले. | दर टनास दहा रुपये. |
| २०. | गार्नेट (अपघर्षक) .. .. | दर टनास पंधरा रुपये |
| २१. | सोने .. .. .. | धातुकाच्या दर टनास दर एक ग्रॅम सोन्यास दोन रुपये आणि हिस्से राशीच्या तत्त्वावर |
| २२. | ग्रॅफाईट : | |
| | (क) ८० टक्के किंवा अधिक कार्बन असलेले .. | दर टनास पंच्याहत्तर रुपये |
| | (ख) ४० टक्के किंवा अधिक परंतु ८० टक्क्यांपेक्षा कमी कार्बन असलेले. | दर टनास चाळीस रुपये. |
| | (ग) २० टक्के किंवा अधिक परंतु ४० टक्क्यांपेक्षा कमी कार्बन असलेले. | दर टनास पंधरा रुपये |
| | (घ) २० टक्क्यांपेक्षा कमी कार्बन असलेले .. | दर टनास दहा रुपये |

| | | |
|---|---|---|
| २३. | जिप्सम .. .. .. | दर टनास आठ रुपये |
| २४. | इल्मेनाईट .. .. .. | दर टनास दहा रुपये |
| २५. | लोह : .. .. .. | |
| | (एक) धातुक— | |
| | (क) ६५ टक्के किंवा अधिक लोह असलेले .. | दर टनास सहा रुपये |
| | (ख) ६२ टक्के किंवा अधिक परंतु ६५ टक्क्यांपेक्षा कमी लोह असलेले. | दर टनास तीन रुपये पन्नास पैसे |
| | (ग) ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक पण ६५ टक्क्यांपेक्षा कमी लोह असलेले. | दर टनास दोन रुपये पन्नास पैसे |
| | (घ) ६० टक्क्यांहून कमी लोह असलेले .. | दर टनास दोन रुपये. |
| | (दोन) विशुद्ध धातुक— | |
| | (क) विशुद्धे (धातुकाच्या तदनुषंगिक खाणकाम व पांजणीत तयार झालेल्या नैसर्गिक विशुद्धांसह). | |
| | (क) ६५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक लोह असलेले. | दर टनास तीन रुपये पन्नास पैसे |
| | (ख) ६२ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ६५ टक्क्यांपेक्षा कमी लोह असलेले. | दर टनास दोन रुपये |
| | (ग) ६२ टक्क्यांपेक्षा कमी लोह असलेले .. | दर टनास एक रुपया पन्नास पैसे |
| | (ख) ४० टक्के किंवा त्याहून कमी लोह असलेले गाळून आणि/किंवा संहतीकरणाने तयार झालेल्या धातुकाचे संहत. | दर टनास पन्नास पैसे. |
| २६. | कायनाईट आणि ॲन्डालुसाईट .. .. | दर टनास चाळीस रुपये |
| २७. | शिसे धातुक .. .. .. | धातुकाच्या दर टनास धातुच्या प्रतिशत दर युनिटला तीन रुपये आणि हिस्से-राशीच्या तत्त्वावर. |
| २८. | लाईम शेल (कॅल्करिअस सँड व चॉक धरून) .. | दर टनास दहा रुपये |
| २९. | चूनखडक (चून कंकर धरून) .. .. | दर टनास दहा रुपये |
| ३०. | मॅग्नेसाईट .. .. .. | दर टनास दहा रुपये |
| ३१. | मँगनीज धातुक— | |
| | (क) मँगनीज-डाय-ऑक्साईड (७८ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक $MNO_2$ आणि ४ टक्के किंवा त्यापेक्षा कमी लोह असलेले). | दर टनास पंचेचाळीस रुपये |
| | (ख) ४६ टक्के व त्यापेक्षा अधिक मँगनीज .. | दर टनास पंधरा रुपये |
| | (ग) ३५ टक्के व त्यापेक्षा अधिक परंतु ४६ टक्क्यांपेक्षा कमी मँगनीज. | दर टनास नऊ रुपये |
| | (घ) ३५ टक्क्यांपेक्षा कमी परंतु २५ टक्क्यांपेक्षा अधिक मँगनीज. | दर टनास सहा रुपये |
| | (ङ) २५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी मँगनीज .. | दर टनास दोन रुपये. |
| ३२. | अभ्रक— | |
| | (क) कच्चे अभ्रक .. .. | दर १०० किलोस दहा रुपये |
| | (ख) बरेच डागाळलेले, गडद डागाळलेले किंवा ठिपके असलेले दुय्यम प्रतीचे अभ्रक. | दर १०० किलोस साठ रुपये |
| | (ग) बरेच डागाळलेले, गडद डागाळलेले किंवा ठिपके असलेले दुय्यम प्रतीचे अभ्रक. | दर १०० किलोस तीस रुपये |
| | (घ) वाया गेलेले व भोकेत काढलेले अभ्रक .. | दर १०० किलोस चार रुपये |
| | (ङ) वाया गेलेले गोल .. .. | दर टनास चाळीस रुपये. |

| | | |
|---|---|---|
| ३३. | मोनाझाइट | दर टनास चाळीस रुपये |
| ३४. | निकेल धातुक | धातुकाच्या दर टनास निकेल धातुच्या प्रतिशत दर युनिटला दोन रुपये आणि हिस्सेराशीच्या तत्वावर. |
| ३५. | ओकर | दर टनास सहा रुपये |
| ३६. | पायराइट | धातुकाच्या दर टनास गंधकाच्या प्रतिशत दर युनिटला पंचवीस पैसे आणि हिस्से-राशीच्या तत्वावर. |
| ३७. | पायरोफिलाईट | दर टनास दहा रुपये |
| ३८. | क्वॉर्टझ आणि सिलिका वाळू आणि साच्याची वाळू | दर टनास पाच रुपये |
| ३९. | क्वॉर्टझाईट | दर टनास पाच रुपये |
| ४०. | रुटाईल | दर टनास शंभर रुपये |
| ४१. | ठासण्यासाठी वाळू | दर टनास चाळीस पैसे |
| ४२. | सिलेनाईट | दर टनास वीस रुपये |
| ४३. | सिलिमेनाईट | दर टनास पन्नास रुपये |
| ४४. | चांदी | धातुच्या दर किलोस एकशे पन्नास रुपये |
| ४५. | स्लेट (दगड) | दर टनास अठरा रुपये |
| ४६. | टाल्क, स्टिएटाईट आणि सोपस्टोन-- | |
| | (क) किटक नाशकांच्या प्रतीची | दर टनास दहा रुपये |
| | (ख) किटक नाशकांची प्रत सोडून | दर टनास तीस रुपये. |
| ४७. | टंगस्टन धातुक | धातुकाच्या दर टनास $WO_3$ च्या प्रतिशत दर युनिटला बारा पये आणि हिस्से-राशीच्या तत्वावर. |
| ४८. | व्हर्मिक्युलाइट | दर टनास आठ रुपये |
| ४९. | वोला स्टोनाईट | दर टनास तीस रुपये |
| ५०. | जस्त धातुक | धातुकाच्या दर टनास जस्त धातुच्या प्रतिशत दर युनिटला सहा रुपये आणि हिस्से-राशीच्या तत्वावर. |
| ५१. | झिर्कोन | दर टनास नव्वद रुपये |
| ५२. | यांत यापूर्वी विनिर्दिष्ट न केलेली अन्य सर्व खनिजे | खाणीतून काढते वेळीच्या विक्री किंमतीच्या दहा टक्के. |

## तिसरी अनुसूची

(कलम ९-क पहा)

### ठोकबंद भाडे

संबंधित भाडेपट्टेदाराच्या मालकीच्या उद्योगधंद्याला कच्च्या मालाचा पुरवठा करण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या भाडेपट्ट्याव्यतिरिक्त इतरांना लागू होणारा ठोकबंद भाड्याचा दर---

दर साल दर हेक्टरी ठोकबंद भाड्याचा दर रुपयांत

| खाणकाम भाड्याचे प्रकार (१) | भाड्याच्या पहिल्या वर्षी (२) | भाड्याच्या दुसऱ्या ते पाचव्या वर्षी (३) | भाड्याच्या सहाव्या ते दहाव्या वर्षी (४) | भाड्याचे अकरावे अकरावे वर्ष व पुढे चालू (५) |
|---|---|---|---|---|
| १. ५० हेक्टर्स पर्यंतचे भाडेपट्टा क्षेत्र | नाही | ३० | ६० | ९० |
| २. ५० हेक्टर्सपर्यंत परंतु १०० हेक्टर्स पेक्षा अधिक नसलेले भाडेपट्टा क्षेत्र. | नाही | ४० | ८० | १२० |
| ३. १०० हेक्टर्सपेक्षा अधिक भाडेपट्टा क्षेत्र | नाही | ६० | १०० | १५० |

(२) संबंधित भाडेपट्टेदाराच्या मालकीच्या उद्योगधंद्यासाठी कच्च्या मालाचा पुरवठा करण्याकरिता घेतलेल्या भाडेपट्ट्याच्या बाबतीत वरील बाब क्रमांक १ मध्ये दिल्याप्रमाणे भाडेपट्ट्याचे क्षेत्र लक्षात न घेता, ठोकबंद भाड्याचे दर लागू होतील.